गुरुवार, ७ डिसेंबर २०२३
⊙ किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - ०३ ⊙ अंक - ११७
⊙ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक

● MARATHI ● DAINIK ● CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) THURSDAY 7 DECEMBER. 2023 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ● YEAR-03 ● ISSUE-117 ● RNI : MAHMAR/2021/82566 ● PAGE-12 ● PRICE-05


## चर्चेतली बातमी

### दहशतवादी अदनानची अज्ञातांकडून हत्या

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** पठाणकोट हल्ला, मुंबईवरील दहशतवादी हल्ला, उधमपूरमधील हल्ला, दिल्लीतल्या संसदेवरील हल्ल्यात अथवा त्या कटात सामील असलेल्या दहशतवाद्यांच्या हत्या होत आहेत. लष्कर-ए-तैय्यबा या संघटनेतील प्रमुख दहशतवादी अदनान अहमद उर्फ हंजला अदनान याची कराचीत अज्ञात हल्लेखोरांनी हत्या केली आहे. हंजला हा २०१६ मध्ये जम्मू काश्मीरच्या पंपोर येथील सीआरपीएफच्या ताफ्यावरील हल्ल्यामागचा सूत्रधार होता. या दहशतवादी हल्ल्यात भारताचे आठ जवान शहीद झाले होते. तसेच २२ जवान जखमी झाले होते. हंजला हा लष्कर-ए-तैय्यबाचा प्रमुख हाफिज सईदचा निकटवर्तीय होता. हंजला अदनानने २०१५ मध्ये उधमपूर येथे बीएसएफच्या ताफ्यावर दहशतवादी हल्ला घडवून आणला होता. या हल्ल्यात दोन जवान शहीद झाले होते. तर १३ जवान जखमी झाले होते. या हल्ल्याप्रकरणी एनआयएने तपास केला आणि ६ ऑगस्ट २०१५ रोजी एक चार्जशीट दाखल केली. हंजला अदनान हाच या दोन्ही हल्ल्यांमागचा मास्टरमाईंड होता हे उघडकीस आले. तसेच तो पाकिस्तानमध्ये बसून हल्लेखोरांना सूचना देत होता. जम्मू-काश्मीरच्या श्रीनगर आणि पुलवामा भागात अनेक आत्मघातकी हल्ल्यांमागे हंजलाचा हात होता. तरुणांना दहशतवादी संघटनांमध्ये भरती करून त्यांना प्रशिक्षण देण्याचे, आत्मघातकी हल्ल्यांसाठी प्रशिक्षित करण्याचं काम हजंला करत होता.

## विनम्र अभिवादन



राज्यघटनेचे शिल्पकार, महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाणदिनी दादर येथील चैत्यभूमीवर आज उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पुष्पचक्र अर्पण करून भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन केले. यावेळी राज्यपाल रमेश बैस, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपस्थित होते.

# नेहरूंच्या दोन चुका भोवल्या

## अमित शाह यांचा संसदेत आरोप

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली : अमित शाह यांनी आपल्या भाषणात भारत-पाकिस्तान युद्धाचा संदर्भ देत थेट पंडित जवाहरलाल नेहरूंना लक्ष्य केले. इथे एका सदस्यानं एका शब्दप्रयोगावर आक्षेप घेतला. मी त्या शब्दप्रयोगाचं समर्थन करण्यासाठी उभा आहे. तो शब्द होता 'नेहरूवियन ब्लंडर'. नेहरूंच्या काळात झालेल्या चुकीमुळे काश्मीरला भोगावं लागलं. मी या सभागृहात उभं राहून जबाबदारीने सांगतो की पंडित जवाहरलाल नेहरूंच्या पंतप्रधान काळात झालेल्या दोन चुकांमुळे पुढची अनेक वर्षं काश्मीरला अनेक गोष्टी सहन कराव्या लागल्या, असे अमित शाह म्हणाले.**



लोकसभा निवडणूक निकालांच्या पार्श्वभूमीवर होत असलेल्या संसदेच्या हिवाळी अधिवेशनात सत्ताधारी व विरोधकांमध्ये जोरदार राजकीय खडाजंगी होण्याची शक्यता वर्तवली जात होती. तसेच काहीसे चित्र अधिवेशनात दिसत असून बुधवारी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी थेट देशाचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरूंबाबत केलेल्या विधानामुळे सभागृहात मोठा गदारोळ झाला. लोकसभेत जम्मू काश्मीरमधील कलम ३७० हटवल्यासंदर्भात अमित शाह निवेदन करत होते. काश्मीरमधून कलम ३७० हटवल्यानंतर केंद्र सरकारने तिथे कोणती विकासकामं केली? असा सवाल विरोधकांकडून सातत्याने उपस्थित केला जातो. त्या प्रश्नावर उत्तर देताना अमित शाह यांनी मोदींनी केलेल्या कामांचा पाढा तर वाचून दाखवलाच, मात्र याचवेळी त्यांनी देशाचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्याकडून झालेल्या दोन चुकांमुळे काश्मीरला पुढची अनेक वर्षं अनेक गोष्टी सहन कराव्या लागल्या, असा दावा अमित शाह यांनी आपल्या भाषणात केला. पंडित जवाहरलाल नेहरूंची पहिली आणि सर्वात मोठी चूक म्हणजे जेव्हा आपले सैन्य जिंकत होते पण पंजाबचा भाग येताच त्यांनी युद्धबंदी केली. त्यामुळे पाकव्याप्त काश्मीरचा जन्म झाला. जर युद्धबंदी तीन दिवस उशीरा झाली असती, तर आज पाकव्याप्त काश्मीर भारताचा भाग असता, असा दावा अमित शाह यांनी यावेळी केला. दरम्यान, अमित शाहा यांच्या या दाव्यावरून काँग्रेस खासदारांनी आक्रमक होत आरडाओरड करायला सुरुवात केली. नेहरूंची दुसरी चूक म्हणजे संयुक्त राष्ट्रात भारत-पाकिस्तान वादाचा मुद्दा नेणं असं अमित शाह म्हणाले. दुसरी चूक म्हणजे संयुक्त राष्ट्रात आपला मुद्दा घेऊन जाण्याची चूक. एका पत्रातल्या मजकुरातला एक भाग मी वाचून दाखवतो, असे म्हणत अमित शाह यांनी हातातील कागदावरचा एक मजकूर वाचून दाखवला. पंडित जवाहरलाल नेहरूंनी शेख अब्दुल्लांना लिहिलेले हे पत्र आहे. 'संयुक्त राष्ट्राच्या अनुभवानंतर मी या निष्कर्षावर पोहोचलोय की तिथून कोणत्याही समाधानकारक उत्तराची अपेक्षा ठेवली जाऊ शकत नाही. मला युद्धबंदी हा एक चांगला निर्णय वाटला. पण या मुद्द्यावर योग्य पद्धतीने उत्तर शोधले गेले नाही. आम्ही युद्धबंदीवर अधिक विचार करून काही चांगला पर्याय शोधू शकलो असतो. मला वाटते की भूतकाळात ही आमच्याकडून झालेली चूक आहे, असा उल्लेख असलेला मजकूर अमित शाह यांनी वाचून दाखवला.

## चालत्या ट्रकने घेतला अचानक पेट

आधुनिक केसरी न्यूज


**इगतपुरी :** मुंबई आग्रा महामार्गावरील कसारा घाट वर चढून आल्यावर चालत्या ट्रकने अचानक पेट घेतल्याने काही काळ वाहतुक ठप्प झाली होती. मंगळवार दि. ५ रोजी रात्री १० वाजेच्या सुमारास मुंबईहुन नाशिकच्या दिशेने कसारा घाटातून भंगार घेऊन ट्रक येत होता. या ट्रकने कसारा घाट पार केल्यानंतर अचानक पेट घेतला. घटनेची माहिती मिळताच इगतपुरी नगर परिषद व महिंद्रा अँड महिंद्रा कंपनीच्या अग्निशमन दल घटनास्थळी दाखल होत आग विझविण्याचे प्रयत्न सुरू करून आग आटोक्यात आणली. शॉर्ट सर्किटमुळे ट्रकने पेट घेतल्याचा अंदाज पोलिसांनी व्यक्त केला. आग लागल्यानंतर काही काळ वाहतुक ठप्प झाल्याने पोलीसांनी खबरदारीचा उपाय म्हणून वाहतूक नाशिक मुंबई महामार्गावरून वळवून मुंबई ते नाशिक जाणारी वाहतूक लेन बंद केली होती.



# आरक्षणाच्या प्रश्नावर चर्चा व्हावी : विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार

आधुनिक केसरी न्यूज

नागपूर : राज्य विधिमंडळाचे हिवाळी अधिवेशन उद्यापासून (७ डिसेंबर) नागपूरच्या विधानभवनात होणार आहे. त्यापार्श्वभूमीवर शासकीय नियमानुसार राज्य सरकारकडून आज विरोधी पक्षातील नेत्यांना चहापानाचे आमंत्रण देण्यात आले होते. परंतु, या चहापानाच्या कार्यक्रमाला विरोधी पक्षांनी नेहमीप्रमाणे बहिष्कार टाकला आहे. महाविकास आघाडीतर्फे ६ डिसेंबर संयुक्त पत्रकार परिषद घेण्यात आली. या पत्रकार परिषदेत विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी अधिवेशन काळात कोणते मुद्दे ठेवणार याविषयी माहिती दिली. विदर्भात अधिवेशन होत असताना विदर्भाचा सुपूत्र म्हणून मी आपल्या सर्वांच्या प्रश्नांना न्याय देईन. महिला, सर्वसामान्यांचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी अधिवेशनात प्रयत्न करेन. शेतकऱ्यांना त्यांच्या हक्काचे मिळावे, या राज्यातील बिघडलेली कायदा सुव्यवस्था सुधारावी, आरक्षणाच्या प्रश्नावर चर्चा व्हावी अशी आमची अपेक्षा आहे. परंतु, या कोणत्याही विषयावर चर्चा होत नाही. यासाठी राज्यापुढील प्रश्न मोठे असताना चहापानाला जाणे उचित नाही, म्हणून आम्ही चहापानाला बहिष्कार टाकण्याचा निर्णय घेतला होता, अशी माहिती विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी दिली.
विधिमंडळ आणि मंत्रिमंडळ नागपुरात आलेले आहे. अध्यक्ष उपाध्यक्ष यावेळी उपस्थित आहेत. खरंतर, पुरोगामी महाराष्ट्र अशी महाराष्ट्राची ओळख आहे. महाराष्ट्रात पक्ष फोडून वेगवेगळ्या पक्षाचे सरकार सत्तेत आलेले आहे. २०२२ वर्षांतील सर्वाधिक गुन्हे नोंदल्याची केंद्रीय गृह मंत्रालयाची माहिती आहे. महायुती सरकार सत्तेत आल्यानंतर दंगलीचे प्रमाण वाढले. नागपुरात अधिवेशन होते, या उपराजधानीत कायदा सुव्यवस्थेचा बोजवारा उडालेला आहे. नागपूरची ओळख चोरांची नगरी म्हणून झाली आहे. याचा अर्थ सरकार सत्तेत आल्यापासून राज्यामध्ये शांतता भंग मोठ्या प्रमाणात होत असताना दिसत आहे. महाराष्ट्राची ही ओळख असेल तर राज्यात गुंतवणूक कशी येईल? असा प्रश्न विजय वडेट्टीवार यांनी विचारला. महाराष्ट्रात शेतकऱ्यांच्या सर्वाधिक आत्महत्या झाल्या आहेत. गरिबी, बेरोजगारीमुळे राज्यात जगणे कठीण झाले. त्यामुळे आत्महत्या झाल्याची नोंद आहे. कर्जबाजारीपणाच्या विळख्यात अडकून आत्महत्यांचे प्रमाण वाढते आहे. दर एक तासाला एकापेक्षा जास्त शेतकरी आणि शेतमजूर आत्महत्या करत आहेत. महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या होत असताना सरकार शासन आपल्या दारी मोठा इव्हेंट होताना दिसतोय. बीडमध्ये दुष्काळ, पाणीटंचाई, अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांचे कंबडरे मोडले असताना करोडो रुपये खर्च करून शासन आपल्या दारी कार्यक्रम राबवत आहे. इव्हेंट करून बॅनर, हार तुरे लावले, याची लाजतरी वाटली पाहिजे. शेतकऱ्यांप्रती कणव नाही, हे यातून दिसून आलेले आहे, अशी टीका विजय वडेट्टीवार यांनी केली.
सरकारचे प्रश्न मोठे आहेत, परंतु अधिवेशाचा कालावधी कमी आहे, त्यामुळे अधिवेशनाचा कालावधी वाढवण्याची मागणी आम्ही करणार आहोत, असेही ते म्हणाले.





विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी

काही दिवसांपूर्वी एका कार्यक्रमाला गेलो होतो. जेव्हा प्रमुख वक्त्यांचे भाषण सुरु झाले तेव्हा त्यांनी मर्यादा सोडून बोलणाऱ्या आजच्या राजकारण्यांवर टीका केली. खरोखरच राजकीय नेते म्हणजे लोकांनी निवडून दिलेले प्रतिनिधी असतात. त्यांनी जबाबदारीने बोलायला हवे. पण त्याचे भान काही अपवाद सोडले तर आज कुठेही दिसत नाही. ते उपरोधिकपणे म्हणाले ' विद्या विनयेन शोभते ' असे एक संस्कृत सुभाषित आहे. पण बोलणाऱ्यानी एवढी खालची पातळी गाठली आहे की ते म्हणतील, ' ही कोण आणि कुठली विद्या ? कुठला विनय ? ' रोजच्या बातम्या पाहिल्या आणि त्यात राजकारण्यांनी केलेली विधाने पाहिली की याचे प्रत्यंतर येते. बातम्या सुद्धा बघू नये असे सुजाण नागरिकांना वाटत असल्यास नवल नाही.

याच व्यासपीठावरून आणखी एक वक्त्या बोलल्या. त्यांनी बोलताना स्वातंत्र्यवीर सावरकरांबद्दल एक विधान केले. त्या म्हणाल्या, ' सुरुवातीला मला सावरकरांबद्दल प्रचंड आदर होता पण आता तो कमी झाला आहे. ' त्याचे कारण त्यांनी सांगितले की राहुल गांधी जर सातत्याने सावरकरांवर टीका करत असतील, तर त्यांच्या हातात काहीतरी पुरावे असल्याखेरीज ते तसे बोलणार नाहीत. आणखी एक वक्ते उभे राहिले ते म्हणाले की या बाई बोलल्या त्यात नक्कीच तथ्य आहे. आपल्याला सावरकरांच्या विरोधात कोणी बोललेलं आवडत नाही कारण तशा प्रकारची विधानं त्यांच्याबद्दल आपण ऐकलेली नसतात. पण म्हणून ते खोटं आहे असं मानायचं कारण नाही. महात्मा गांधींनी आपण केलेल्या चुकांची कबुली ' माझे सत्याचे प्रयोग ' या पुस्तकात दिली आहे. अशी कबुली देण्यासाठी फार मोठे मन लागते. याच व्यासपीठावरून मग दाभोलकर, पानसरे आणि गौरी लंकेश यांनी विरोधाची भूमिका घेतली म्हणून त्यांची हत्या करण्यात आली.



# आनंदी पहाट

## अध्यात्म अंतरात्म्याच्या सक्रिय सहभागाने अनुभवावे

आधुनिक केसरी



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

अध्यात्म हे कल्याण, मानसिक समाधान, यश, शांतता, आत्मिक समाधान यांच्याशी संबंधित असलेल्या क्षमतांचे स्वरूप तसेच मूळ उद्दिष्ट आहे; ज्यामुळे व्यक्तीला सर्वांगीण स्वरूपाची स्थिती प्राप्त करण्यास सक्षम करते. ही आत्मिक कौशल्ये आहेत, जी माणसामध्ये परिवर्तन घडवून आणतात. एकप्रकारे त्यांचे आचरण आणि कार्यप्रदर्शन प्रतिबिंबित करतात. ती अशी क्षमता आहे, जी अनेक भागांना एका संपूर्ण भागामध्ये जोडतात. त्यामुळे आध्यात्मिक भांडवल हे वैयक्तिक आणि सामाजिक विकासासाठी सर्वात उदात्त भांडवल मानले जाते. डोळ्यांशिवाय; वास्तविकता पाहण्याची सक्षमता, गुणविशेष ते देते आणि आत्म्याच्या सक्रीय सहभागाने समाज अनुभवू देते. अध्यात्म हा अर्थव्यवस्थेच्या मानवीकरणाचा मार्ग आहे आणि समाजातील मानवीकरण मूल्यांच्या प्रसारासाठी एक धोरणात्मक परिवर्तन आहे. येथे, एकता, प्रेम, इतरांबद्दल आदर, आनंद, सौहार्द, मानवता, इतरांबद्दलच्या संवेदना असतात. नवीन अर्थव्यवस्थेसाठी आध्यात्मिक मूल्ये आणि गतिशील कौशल्ये आहेत. अध्यात्म ही स्पर्धात्मक बाजारपेठेतील कामगिरी आणि संघटनांच्या भेदासाठी संधीच आहे. हे संस्थांचे उद्दिष्ट ओळखण्यास अनुमती देते, नागरिक तसेच संस्थांना या वस्तुस्थितीची जाणीव करून देते, की ते एकाकी राहत नाहीत. कार्य आणि भौगोलिक स्थान विचारात न घेता अनेक बाबींचा विचार करणे आवश्यक असते. मानवी घटक हा शरीर, मन आणि आत्मा यांच्याव्दारे एकाच वेळी बनलेला असतो; म्हणूनच अध्यात्म ही एक भावना आहे, जी विश्वाला त्याच्या संपूर्णतेमध्ये एकत्र करते. ही एक भावना आहे, जी व्यक्तीच्या आतून येते आणि मनाच्या जगण्याच्या प्रवृत्तीच्या पलीकडे जाते. व्यावसायिक जगात, अध्यात्म एकात्मता, प्रेरणा आणि समाधानामध्ये सुधारणांमध्ये समाविष्ट होते. कॉर्पोरेट गव्हर्नन्समध्ये प्रामाणिकपणा, आंतरिकता आणि सर्जनशीलता यासारख्या मूल्यांचा संच स्थिर असणे आवश्यक असते. ही देखील आध्यात्मिकदृष्ट्या मात्वाची बाब असल्याचे स्पष्ट होत असते.



आधुनिक केसरी

## मुक्तीचे आंदन | देई मुक्ता ||

सुटावी उपाधी | लागावी समाधी ||
ज्ञानेशाची आधी | ओवी व्हावे ||१||
तुकाचा गजर | अभंगात गावा ||
एकरूप व्हावा | आत्माराम ||२||
नाम्याचा महिमा | नामाने जिंकावा ||
विठ्ठल कोंडावा | काळजात ||२||
अलंकार ल्यावा | भक्तीचा जीवाने ||
दाविला शिवाने | नरहरी ||३||
नाथाची गौळण | संतांची राखण ||
भारूड गोंदन | जन्मा लाभे ||४||
मीरेची भक्ती | जनीचे दळण ||
मुक्तीचे आंदन | देई मुक्ता ||५||




प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

# निरुपण

आधुनिक केसरी

तारुण्य आंगीं भरलें ।धारिष्ट न वचे धरिलें ।
करूं नयें तेंचि केलें ।माहापाप ॥१३॥
स्त्री केली परी धाकुटी ।धीर न धरवेचि पोटीं ।
विषयलोभें सेवटीं ।वोळखी सांडिली ॥१४॥
माये बहिण न विचारी ।जाला पापी परद्वारी ।
दंड पावला राजद्वारीं ।तऱ्हीं पालटेना ॥१५॥

# घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !



स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

आपा आप मिटाय कर, सद्गुरु शरणहिं लाग । एक संग गुरु आप नहिं, एक ज्ञान गुरु जाग ।।०५।।(स्वर्वेद पंचम मण्डल पंचम अध्याय) ०५/०५/०५

मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :
मी आणि माझे स्वतःतील ममत्व, अभिमान हे दोन्हीही सोडून सद्गुरूंशी संबंध करावा. 'मी' पणा आणि गुरू एकसाथ राहू शकत नाहीत. म्हणून जीवनात एक गुरू आणि त्यांचे ज्ञानच सदैव जागृत असावे.

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.

# काव्य-चरितावली

आधुनिक केसरी

पुष्प ५५वे

आईसमवेत श्रीमहाराजांनी केला ।
महिनाभराचा मुक्काम काशीला । घेउनी
जाती रोज आईला। गंगा स्नानासाठी ।।१।।
भिकाऱ्यांना दान देणे । भक्तजनांना
सहस्त्र- भोजने । संन्यासीना देती भोजने ।
नित्यक्रम असे असा हा ।।२ ।।
होई चर्चा, वाद- विवाद होती ।श्री
महाराजांकडे विद्वान, पंडित येती । जन हे
सारे प्रसन्न होती । लीन, मधुर भाषा ऐकुनी
महाराजांची ।।३ ।।
आत्मानंदस्वामी शिष्या समवेत आले ।
परिचित बाबूभट ही आले । त्यांनी पाहिले
। श्री महाराज होते आईच्या सेवेत ।। ४।।
हे दृश्य पाहुनी । आले अश्रू स्वामींच्या
लोचनी । अनुकूल भाव प्रकटी मनी ।
पाहता महाराजांची मातृभक्ती ।।५ ।।
स्वामींनी ईच्छा व्यक्त केली मनीची ।
सांगावी महती रामनामाची । सांगती
महाराज महती नामाची । आत्मानंद
स्वामींना ।। ६ ।।



अरुण वि. देशपांडे
संपर्क क्र. 9850177342

# गुणरूप

आधुनिक केसरी




सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

अनेक जन्माच्या पुण्याईने--सुकृताने हा नरदेह लाभलेला असतो. त्यातही भाग्य फळफळले तरच परमार्थाचा मार्ग सापडतो .धर्मकार्याची आवड असणे,देह बुध्दीचा त्याग, आसक्तीच्या मोहापासून दूर,अनुताप,सतत दानधर्म करत रहाणे, भौतिक गोष्टींत सतत अडकून न पडता, भूतदया,अत्यंत सुलभ असलेले भगवंताचे भजन,पुण्यरूप असा परोपकार करावा, ज्ञानमार्ग चा अवलंब करावा,विधिशास्त्रांचा अभ्यास करावा.यथाशक्ति आपले चित्त व धन परमेश्वराच्या पायावर अर्पण करावे.

# तळमळ लागल्यावर गुरुभेट निश्चित !

आधुनिक केसरी

काय करावे हे मनुष्याला कळते, पण त्याचे मन त्याला आवरत नाही. विषयाचा उपभोग घेताना आपले मन त्यामध्ये रंगून जाते, आणि त्याचे सुखदुःख निस्तरताना मात्र आपली भ्रमिष्टासारखी चित्तवृत्ती होते. आपल्याला झालेला भ्रम नाहीसा करायला तीन गोष्टी आवश्यक आहेत : एक सद्विचार, दुसरी नामस्मरण, आणि तिसरी सत्संगती. संत ओळखणे फार कठीण आहे. आपण त्याच्यासारखे व्हावे तेव्हाच तो कळायचा. त्यापेक्षा सद्विचार बाळगणे सोपे. भगवंताचा विचार तोच सुविचार होय. भगवंताच्या कथा ऐकाव्यात, त्याच्या लीला वर्णन कराव्यात, त्याच्या वर्णनाचे ग्रंथ वाचावेत, पण याहीपेक्षा, आपल्याजवळ नेहमी राहणारे असे त्याचे नाम घ्यावे. तुम्ही नेहमी नाम घेत गेलात, तर तुम्हाला संत धुंडीत जाण्याची जरुरी न पडता, संतच- अगदी हिमालयांतले संत, तुम्हाला धुंडीत येऊन तुमचे काम करतील. अहो, खडीसाखर ठेवली की मुंगळ्यांना आमंत्रण करायला नको ! तुम्ही म्हणाल, ‘ आम्हाला ते करता येत नाही. ’ पण



आपण आपल्या मुलाला शाळेत घालतो, आणि तो न शिकला किंवा त्याला अभ्यास येत नसला, तर पुन्हा त्याच वर्गात त्याला बळजबरीने ठेवतोच की नाही ? त्याला एक विद्या आली नाही, तर दुसरी कोणती येईल ती शिकवतोच की नाही ? आणि त्याने आपल्या पोटापाण्याची व्यवस्था करायला तयार व्हावे म्हणून आपल्याला तळमळ लागतेच की नाही ? तशी परमेश्वर मिळावा म्हणून आपल्याला तळमळ लागली आहे का ? तशी तळमळ लागली म्हणजे तुमचा गुरू प्रत्यक्ष जमिनीतून वर येईल. तो सारखा तुमच्याकरिता वाट पाहात असतो.

आई मुलाची फार तर एक जन्मापर्यंत, म्हणजे देह आहे तोपर्यंतच, काळजी करील; पण गुरू हा जन्मोजन्मी तुमची काळजी घ्यायला तयार आहे. त्याला देह नसला, तरी तो नाही असे समजू नका. तुम्ही दुश्चित्त झाला म्हणजे तो दुश्चित्त होतो. म्हणून तुम्ही केव्हाही दुश्चित्त होऊ नका. देहाचे भोग येतील-जातील, पण तुम्ही सदा आनंदात रहा. तुम्हाला आता काही करणे उरले आहे असे मानू नका. गुरुभेट झाली म्हणजे तुम्ही तुम्हीपणाने उरतच नाही. मात्र, गुरूला अनन्य शरण जा. एक शिष्य मला भेटला, तेव्हा तो आनंदाने नाचू लागला. मी त्याला विचारले, “ तुला एवढा आनंद कसला झाला आहे ? ” त्यावर तो म्हणाला, “ मला आता आनंदाशिवाय काही उरलेच नाही, कारण मला आज गुरू भेटले ! ” जो असा झाला, त्यालाच खरी गुरूची भेट झाली. तुम्ही गुरूला अनन्य शरण जा, म्हणजे तुम्ही आणखी काही करण्याची जरुरी नाही. ”१९७. भगवंताची तळमळ हा साधकपणाचा प्राण आहे.

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक
गुरुवार, ७ डिसेंबर २०२३
adhunikkesari.com Adhunik Kesari



भारतीय नौदलाच्या कसोटीचा काळ
पान ६

# शेतकऱ्यांवर दुबार पेरणीचे संकट

## अवकाळीसह ढगाळ वातावरणाचा पिकांना फटका

आधुनिक केसरी न्यूज

**अरविंद देशमुख**

**रिसोड :** नुकताच झालेला बेमौसमी अवकाळी पाऊस व सततच्या ढगाळ वातावरणामुळे तुरीचे पीक आळ्यांनी फस्त करुन टाकले आहे.तर हरभरा पिकावर बुरशीजन्य रोगांचा मोठ्या प्रमाणात प्रादुर्भाव झाला आहे. परिणामी हरभरा पिकाचे रोपटे वाळून जात आहेत. त्यामूळे तालुक्यातील शेतकऱ्यांवर दुबार पेरणीचे संकट ओढवले आहे. तालुक्यात नुकत्याच झालेल्या अवकाळी पावसामुळे रब्बी हंगामातील पिकांचे खुप मोठे नुकसान झाले आहे. ऐन फुले व शेंगांच्या मौसमात असलेले तुरीचे पीक भुईसपाट होऊन आळ्यांनी फस्त केले आहे.तर सततच्या ढगाळ वातावरणामुळे बुरशीजन्य रोगांचा मोठ्या प्रमाणात प्रादुर्भाव होऊन हरभऱ्याचे उभे पीक वाळून खाक होत आहे. आधीच अल्पवृष्टीमुळे खरीप हंगाम हातातून गेल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत. आता पुन्हा रब्बी हंगामातील पीक वखरून त्याशेतात दुबार पेरणी करावी लागणार असल्याने शेतकरी चिंताग्रस्त झाले आहेत. तालुक्यातील नेतन्सा,करडा,महागाव, शेलुखडसे आदी अनेक गावातील शेतकऱ्यांनी मर रोगांचा प्रादुर्भाव झालेल्या हरभरा पिकाच्या शेतात वखर फिरवून दुबार पेरणीची मशागत सुरु केली आहे. खरीप हंगामातील पीक विम्याची अग्रीम रक्कम अद्यापही शेतकऱ्यांच्या खात्यात जमा न झाल्यामुळे दुबार पेरणीसाठी शेतकऱ्यांना खाजगी सावकाराचा सहारा घ्यावा लागत आहे. शेती व्यवसाय संपूर्णतः निसर्गावर अवलंबून असल्यामुळे भविष्यातही पीक हाती येईलच याची शाश्वती नाही. त्यामूळे पुन्हा एकदा शेतकरी खाजगी सावकाराच्या पाशात अडकू शकतात. परिणामी शेतकरी आत्महत्येचे सत्र सुरु होण्याची भीती वर्तवण्यात येत आहे.



"हाताच्या काकणाला आरसा कशाला ? पांचानाम्याचे नाटक नको, सरसकट आथिर्क मदत देण्यात यावी .

यावर्षीच्या संपूर्ण पावसाळ्यात पडला नाही, त्यापेक्षा जास्त प्रमाणात बेमोसमी अवकाळी पाऊस पडला . हे सर्वश्रुत आहेच . त्यामूळे कोवळ्या शेंगांनी बहरलेले तुरीचे पीक जमीनदोस्त झाले हे सुद्धा निर्विवाद सत्य आहे . ढगाळ वातावरणामुळे हरभरा पिकावर मर रोगाचा प्रादुर्भाव होतो हे महसूल कर्मचाऱ्यांना व अधिकाऱ्यांना चांगल्या प्रकारे अवगत आहे . तालुक्यातील हवालदील झालेले शेतकरी हरभऱ्याचे उभे पीक वखरून, नांगरून दुबार पेरणीसाठी आर्थिदृष्टया तडफडत आहेत . हे सत्य वास्तव असातांना, " हाताच्या कंकणाला आरसा कशाला . . ?" असा प्रश्न उपस्थित केला जात आहे . त्यासाठी विद्यमान सरकारने प्रशासनाला पंचानाम्याचे कुठलेही नाटक न करता शेतकऱ्यांना सरसकट आथिर्क मदत देण्यात यावी . अशी मागणी जोर धरत आहे .

# भोकरला साडेतीनशे लिटर शिंदी जप्त

आधुनिक केसरी न्यूज

**भोकर :** येथील पोलिसांनी नुकतेच अवैध रसायन मिश्रीत शिंधी विक्री करणा-या अडयावर मंगळवारी ता (पाच )छापा टाकून एका महिलेसह दोघांना अटक करून त्यांच्याकडून सुमारे साडेसात लाखाच मुद्देमाल जप्त केला आहे. येथील शासकीय गोदामा जवळ एका टाटा कंपनीच्या इंट्रा लोडिंग ऑटो मधून सिंधी उतरविल्या जात असल्याची गोपनीय माहिती पोलिसांना मिळाली त्यानुसार मंगळवारी  सकाळ १० च्या सुमारास अचानक छापा टाकून साडेतीनशे लिटर शिंधी सह टाटा कंपनीचा लोडिंग ऑटो (क्रमांक एम एच १० सी आर ७३ ९६) ज्याची किंमत सात लाख रुपये असे एकूण सात लाख दहा हजार पाचशे रुपयांचा मुद्देमाल जप्त करून आरोपी सायलू जिंकलवाड, भुमेश जिंकलवाड, चंद्रकलाबाई जिंकलवाड राहणार (सर्व नंदीनगर, भोकर)यांना ताब्यात घेऊन  गुन्हा दाखल केला आहे. आरोपींना नोटीस देऊन सोडून देण्यात आल्याचे कळते. या कारवाईमुळे अवैध शिंदी विक्रीवर आळा बसण्यास मदत होईल अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे. सदर कारवाई पोलीस निरीक्षक नानासाहेब उबाळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस आमदार नामदेव जाधव, मंगेश शिरसागर, आरकिलवार, परमेश्वर कळणे, मोईन आदींनी केली आहे.

# मालेगावच्या पाणी प्रश्नाचा शासन आदेश प्राप्त

## फडणवीसांनी शब्द केला पूर्ण : ॲड.नकुल देशमुख यांची माहिती

आधुनिक केसरी न्यूज

**रिसोड :** मालेगाव शहराचा चाळीस वर्षापासून



प्रलंबित असलेला पाणी प्रश्न कायमचा मार्गी लागला. ४ डिसेंबर रोजी शासन आदेश प्राप्त झाला असून. राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपल्या आश्वासनाची पूर्तता केली व माजी खासदार अनंतरावजी देशमुख यांच्या मागणीला यश आले आहे .अशी माहिती भारतीय जनता पक्षाचे रिसोड-मालेगाव विधानसभा निवडणूक प्रमुख ॲड.नकुलदादा देशमुख यांनी दिली आहे. मालेगाव शहरातील जनता चाळीस वर्षांपासून पाण्याच्या समस्येला समोर जात होते. त्यांच्या पदरी अनेक वेळा निराशा आली होती. परंतु माजी खासदार अनंतराव देशमुख यांनी रिसोड येथे 13 एप्रिल रोजी राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांना मालेगाव शहराचा पाणी प्रश्न सोडविण्यासाठी जाहीर सभेत मागणी केली होती. त्यावेळी राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांनी हजारो लोकांच्या जनसमुदायासमोर चाकातीर्थ जलाशय ते मालेगाव शहर पाणीपुरवठा प्रश्न मार्गी लावण्याचे आश्वासन दिले होते. त्या आश्वासनाची पूर्तता करत देवेंद्रजी फडणवीस यांनी मालेगाव शहराचा पाणी प्रश्न कायमचा मिटवला व आपल्या शब्दाची पूर्तता केली असून माजी मंत्री अनंतराव देशमुख यांच्या मागणीला व भारतीय जनता पक्षाचे रिसोड विधानसभा निवडणूक प्रमुख ॲड नकुल देशमुख यांच्या पाठपुराव्यास यश आले असून मालेगावकर नागरिकांच्या वतीने मालेगाव पाणीपुरवठा योजनेस अंतिम मंजुरात मिळून शासकीय आदेश प्राप्त झाल्यानंतर आनंदाचे वातावरण आहे.



दिनांक ४ डिसेंबर रोजी प्राप्त झालेल्या शासन आदेशात चाकतीर्थ जलाशय ते मालेगाव शहर पाणीपुरवठा योजनेस ४६ कोटी ४७ लक्ष ४९६०३ रुपये मंजुरात करण्यात आलेले आहेत. यामुळे मागील ४० वर्षापासून प्रलंबित असलेला मालेगाव शहराचा पाणी प्रश्न मार्गी लागला असून.मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस, अजित दादा पवार ,खासदार संजय जी धोत्रे यांचे माजी मंत्री अनंतराव देशमुख यांचे देशमुख यांनी आभार व्यक्त केले. चाळीस वर्षापासून प्रलंबित असलेला मालेगाव शहरातील जनतेचा हा दिवाळीचा प्रश्न कायमचा मार्गी लागल्यामुळे मालेगावकर नागरिकांमध्ये आनंदाचे वातावरण असून जनतेतून मागणीची पूर्तता केल्याबद्दल आनंद व्यक्त होत आहे.

# मद्यप्राशन करून वाहने चालविणाऱ्यांवर कारवाई

## सपोनि देविदास वाघमोडे यांचा इशारा

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** कन्नड तालुक्यातील पिशोर



पोलिस ठाण्यात नव्यानेच रुजू झालेले पुरस्कारीत नेमकाच त्यांना सिल्लोड येथे दि.३०/११/२३ रोजी प्रथमच राज्यस्तरीय ज्ञानपंख गौरव पुरस्कार सोहळा प्रतिष्ठान व आपले ज्ञानपंख वृत्तपत्राच्या मुख्य संपादक दशरथ सुरडकर व मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार देऊन सपोनि देवीदास वाघमोडे यांना गौरविण्यात आले आहे आणि बदली पिशोर पोलिस ठाण्यात झाली आहे. रुजू होताच पिशोर परिसरात आता येणाऱ्या नवीन वर्षाच्या दिवशी मद्यप्राशन करून भरधाव वेगाने वाहन चालविणाऱ्या चालकविरुद्ध कठोर कारवाई केली जाईल यासाठी पिशोर विविध ठिकाणी पोलीस पथक तैनात करण्यात येणार आहेत अशी माहिती नव्याने रुजू झालेले अवैध धंद्यावालांचे कर्दनकाळ पिशोर पोलिस ठाण्याचे सपोनि देवीदास बाळासाहेब वाघमोडे यांनी पिशोर पोलीस ठाण्यात आयोजित कार्यक्रमात बोलताना सांगितले आहे.सण उत्सव व नवीन वर्ष न नशा पाणी करता शांततेत साजरे करावेत कोणाला काही अडचण आल्यास थेट पिशोर पोलिस स्टेशन संपर्क साधावा.सण उत्सव, लग्न समारंभ  मिरवणुकीत कुणीही मद्यप्राशन करणार नाही याची काळजी नागरिकांनी घ्यावी असे आवाहन कर्दनकाळ असलेले सपोनि देवीदास वाघमोडे यांनी केले. मद्यपी वाहनचालक, स्टंटबाजी करताना आढळून आल्यास दंडात्मक कारवाई केली जाईल कोणत्याही प्रकारची गैय केली जाणार नाही. असा इशाराहि त्यांनी दिला आहे.

# जामनेर तहसीलदार आगळे यांनी केली नुकसानग्रस्त पिकांची पाहणी

## पंचनामे करून अहवाल शासनाकडे पाठविला जाईल

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** जामनेर तहसीलदार नानासाहेब आगळे यांनी अवकाळी पाऊसामुळे झालेल्या शेतकऱ्यांची शेतात बांधावर जाऊन नुकसानीची पाहणी केली. जामनेर तालुक्यात अचानक सोसाट्याच्या वार्‍यासह आलेल्या अवकाळी पाऊस झाल्यामुळे शेतकर्‍यांचे नुकसान झाले आहे. जामनेर तालुक्यात  वातावरणात अचानक बदल होऊन आलेल्या वादळी वारा व मुसळधार पाऊस झाल्यामुळे येत्या काही दिवसांत काढणीला आलेल्या कपाशी , केळी पिकांचे आदी नुकसान झाले आहे. जामनेर तालुक्यातील पिंपळगाव बुद्रुक, वडगाव आदी गावांना या अवकाळी पावसाचा जास्त फटका बसला आहे. शेतकऱ्याच्या झालेल्या नुकसानीची तहसीलदार नानासाहेब आगळे यांनी नुकसानीची पाहणी केली. नुकसानीचे पंचनामे करून अहवाल शासनाकडे पाठविला जाईल अशी माहिती तहसीलदार नानासाहेब आगळे  यांनी दिली आहे याचा फायदा शेतकऱ्यांना होईल अशी मी ग्वाही देतो असे जामनेर तहशिलदार नानासाहेब आगळे बोलत होते.

# द्रमुक खासदाराची माघार

आधुनिक केसरी

भाजपाचा विजय केवळ गोमुत्र राज्यातच झाला असून त्यांची ताकद हिंदी भाषिक राज्ये जिंकण्यापूरतीच आहे, असे वक्तव्य थेट लोकसभेत करून द्रमुक पक्षाचे खासदार डी. एनव्ही सेंथिलकुमार यांनी खळबळ उडवून दिली होती. मंगळवारी (दि. ५ डिसेंबर) द्रविड मुन्नेत्र कळघम (डीमके) अर्थात द्रमुक पक्षाचे खासदार सेंथिलकुमार यांनी लोकसभेच्या पावसाळी अधिवेशनात बोलत असताना सदर वक्तव्य केल्यानंतर भाजपाकडून जोरदार टीका करण्यात आली होती. या वक्तव्यावरून गदारोळ झाल्यानंतर आज सेंथिलकुमार यांनी आपले वक्तव्य मागे घेत असल्याची घोषणा केली आणि वादावर पडदा टाकला. काल माझ्याकडून अनवधानाने एक विधान केले गेले, त्यामुळे लोकसभेतील काही सदस्य आणि देशातील नागरिकांच्या भावना दुखावल्या गेल्या. त्यामुळे मी माझे वक्तव्य मागे घेत असून माझ्या भाषणातील ते शब्द पटलावरून काढून टाकावेत, त्याबद्दल मी क्षमा मागतो, अशी भूमिका सेंथिलकुमार यांनी मांडली. खासदार सेंथिलकुमार यांनी लोकसभेत आपली भूमिका मांडण्यापूर्वी एक्स या सोशल मीडियावरदेखील आपल्या वक्तव्याबद्दल माफी मागितली. पाच राज्यातील निकालांबाबत लोकसभेत भाषण करत असताना माझ्याकडून चुकून काही नको ते शब्द बाहेर पडले. ते शब्द मी जाणूनबुजून वापरले नव्हते. त्या शब्दांमधून चुकीचा अर्थ गेल्याबद्दल मी दिलगिरी व्यक्त करत आहे, अशी पोस्ट सेंथिलकुमार यांनी ट्विटरवर टाकली आहे. नुकत्याच झालेल्या पाच राज्याच्या विधानसभा निवडणुकीत भाजपाला राजस्थान, मध्य प्रदेश आणि छत्तीसगड या राज्यांमध्ये मोठा विजय मिळाला. तर तेलंगणा आणि मिझोरम राज्यात भाजपाला फारसे यश मिळाले नाही. याचा संदर्भ देत असताना द्रमुकच्या खासदाराकडून आक्षेपार्ह शब्द वापरण्यात आले. खासदार सेंथिलकुमार यांच्या विधानानंतर भाजपाने जोरदार हल्लाबोल केला. द्रमुककडून सनातनी परंपरेचा अनादर केला जात आहे, तसेच त्यांच्याकडून ज्यापद्धतीची भाषा वापरली गेली, त्याबद्दल भाजपाने आक्षेप व्यक्त केला. फक्त भाजपाच नाही तर इंडिया आघाडीतील काँग्रेस पक्षाचे खासदार कार्ती चिदंबरम आणि राजीव शुक्ला यांनीही या विधानाचा निषेध केला. द्रमुक पक्षाचे प्रमुख आणि तमिळनाडूचे मुख्यमंत्री एमके स्टॅलिन यांचे सुपुत्र, कॅबिनेट मंत्री उदयनिधी स्टॅलिन यांनी काही महिन्यांपूर्वी सनातन धर्मावर टीका केल्यानंतर देशभरात वाद उफाळला गेला होता. त्यानंतर द्रमुक पक्षाच्या खासदारानेच गोमुत्राबाबत आक्षेपार्ह वक्तव्य करून भाजपाला डिवचल्यामुळे भाजपाने ही संधी साधून द्रमुकवर जोरदार टीका केली. सेंथिलकुमार यांच्या वक्तव्यानंतर लोकसभेचे अध्यक्ष ओम बिर्ला यांनी त्यांच्या भाषणातील चुकीचा शब्द काढून टाकला असल्याची घोषणा केली होती. द्रमुक पक्षाच्या खासदाराने आपल्या वक्तव्याबद्दल माफी मागितली असली तरी भाजपाचे खासदार रमेश बिधुरी यांनी अद्याप त्यांच्या आक्षेपार्ह विधानाबाबत माफी मागितलेली नाही.

# बुद्ध आणि त्यांचा धम्म



श्रीकृष्णदास निरंकारी (बापू)
संपर्क क्र. 9423714883

आधुनिक केसरी

**डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या अध्यक्षतेखाली २ मे १९५० रोजी भारतात पहिली सार्वजनिक बुद्ध जयंती दिल्ली येथे साजरी झाली होती. याप्रसंगी आंबेडकरांनी बुद्धांच्या जीवन कार्यावर विचार मांडले. या जयंती समारंभास अनेक देशांचे प्रतिनिधी, भिक्खू संघ व सुमारे वीस हजार लोकांचा समुदायही उपस्थित होता. विश्ववंद्य बाबासाहेबांनी ५ डिसेंबरच्या सायंकाळी "बुद्ध आणि त्यांचा धम्म" या ग्रंथाच्या प्रास्ताविक आणि परिचय या दोन प्रकरणांच्या प्रती आणून त्यांनी रात्री त्यांची तपासणी केली.**

दुसऱ्या दिवशी पहाटे १२.१५ वाजता ६ डिसेंबर इ.स. १९५६ रोजी दिल्लीला निवासस्थानी त्यांचे महापरिनिर्वाण- निधन झाले. भीमराव रामजी आंबेडकर तथा डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा जन्म दि.१४ एप्रिल १८९१ रोजी झाला. हे भारतीय न्यायशास्त्रज्ञ, अर्थशास्त्रज्ञ, राजकारणी, तत्त्वज्ञ आणि समाजसुधारक होते. त्यांनी दलित बौद्ध चळवळीला प्रेरणा दिली आणि अस्पृश्य-दलित लोकांविरुद्ध होणारा सामाजिक भेदभाव नष्ट करण्यासाठी चळवळ उभारली, तसेच महिलांच्या आणि कामगारांच्या हक्कांचे समर्थन केले. ते ब्रिटिश भारताचे मजूरमंत्री, स्वतंत्र भारताचे पहिले कायदेमंत्री, भारतीय संविधानाचे शिल्पकार, भारतीय बौद्ध धर्माचे पुनरुज्जीवक होते. देशाच्या विविध क्षेत्रांत दिलेल्या योगदानामुळे त्यांना आधुनिक भारताचे शिल्पकार किंवा आधुनिक भारताचे निर्माते असेही म्हणतात.

इ.स.१९५१मध्ये आंबेडकरांच्याच अध्यक्षतेखाली तीन दिवसीय बुद्ध जयंती महोत्सव साजरा झाला. इ.स. १९५६ला आंबेडकरांनी आपल्या आयुष्यातील शेवटची बुद्ध जयंती दिल्लीतच साजरी केली. आंबेडकरांनी दिल्लीशिवाय महाराष्ट्रातही बुद्ध जयंतीस इ.स. १९५३ पासून सुरुवात केली. इ.स. १९५६ पर्यंत त्यांच्या अध्यक्षतेखाली व प्रमुख उपस्थितीत बुद्ध जयंतीचे महाराष्ट्रात भव्य कार्यक्रम झाले. महाराष्ट्रातले बुद्ध जयंतीचे कार्यक्रम प्रामुख्याने मुंबईत झाले. भारतात व महाराष्ट्रात बुद्ध जयंती महोत्सवाच्या परंपरेची सुरुवात आंबेडकरांनी केली, म्हणून त्यांना भारतातील सार्वजनिक बुद्ध जयंती महोत्सवाचे प्रणेते समजले जाते. इतर सर्व धर्मसंस्थापकांच्या जन्मदिनी देशात सुट्टी मिळते. मग मानवतेचा महान संदेश देण्याऱ्या तथागत बुद्धांच्या जयंतीस सुट्टी का नाही? एक तर नियोजित सुट्ट्यातील एक सुट्टी कमी करा अथवा एक सुट्टी वाढवून आम्हाला द्या. अशी आग्रही मागणी डॉ.आंबेडकरांनी तत्कालीन केंद्र सरकारकडे केली होती. बुद्ध जयंती दिनी सार्वजनिक सुट्टी असावी, ही सन १९४२पासूनच मागणी होती. त्यांच्या प्रयत्नांमुळे व दबावामुळे दि.२७ मे १९५३ रोजी केंद्र सरकारने बुद्ध जयंती निमित्त सार्वजनिक सुट्टी जाहीर केली. महाराष्ट्र सरकारने मात्र त्या वर्षी सार्वजनिक सुट्टी जाहीर केली नाही. या सर्व बाबींचा उल्लेख आंबेडकरांनी सन १९५३च्या आपल्या मुंबईतील बुद्ध जयंती कार्यक्रमाच्या भाषणात स्वतः केला आहे.

नागपूर व चंद्रपूर येथील धर्मांतराचे झाल्यावर डॉ.आंबेडकर दिल्लीला परतले. त्यानंतर काही आठवड्यात दि.२० नोव्हेंबर १९५६मध्ये ते नेपाळमधील काठमांडूला वर्ल्ड फेलोशिप ऑफ बुद्धिस्टच्या चौथ्या परिषदेस हजर राहिले. तेथे त्यांनी बुद्ध की कार्ल मार्क्स या विषयावर भाषण केले. त्यात त्यांनी भगवान बुद्धाचा मार्ग मार्क्सपेक्षा



श्रेष्ठ आहे, ज्यात प्रेम, न्याय, बंधुत्व, विज्ञानवाद असून तो शोषण समाप्त करू शकतो असे सांगितले. आपल्या परतीच्या प्रवासात त्यांनी बनारसमध्ये दोन भाषणे दिली. दिल्लीमध्येही त्यांनी विविध बौद्ध समारंभांत भाग घेतला. त्यानंतर त्यानी राज्यसभेच्या अधिवेशनात भाग घेतला आणि आपल्या ''भगवान बुद्ध आणि कार्ल मार्क्स'' या पुस्तकाचे शेवटचे प्रकरण लिहून पूर्ण केले. ५ डिसेंबरच्या सायंकाळी ''बुद्ध आणि त्यांचा धम्म'' या ग्रंथाच्या प्रास्ताविक आणि परिचय या दोन प्रकरणांच्या प्रती आणून त्यांनी रात्री त्यांची तपासणी केली. दुसऱ्या दिवशी पहाटे १२.१५ वाजता ६ डिसेंबर इ.स. १९५६ रोजी दिल्लीला निवासस्थानी त्यांचे निधन- महापरिनिर्वाण झाले. त्यावेळी त्यांचे वय ६४ वर्ष आणि ७ महिन्याचे होते. दिल्लीहून विशेष विमानाने त्यांचे पार्थिव मुंबईला आणण्यात आले. मुंबई हे ठिकाण अत्यंविधीसीठी निश्चित झाले, त्यानंतर देशभरातील त्यांचे अनुयायी मिळेल त्या साधनाने मुंबईला येऊ लागले. डॉ.आंबेडकर यांच्या धर्मांतरानंतरच्या सात आठवड्यांत त्यांनी बौद्ध धम्माच्या प्रचारासाठी मोठे कार्य केले. त्यांची अंत्ययात्रा राजगृह, हिंदू कॉलनी, दादर येथून दुपारी १.४० वाजता निघाली. दादर व्हिन्सेन्ट रोड (आताचा डॉ. बाबासाहेब आंबेडकर रोड), पोयबावडी, परळ, एलफिन्स्टन ब्रिज, सयाजी रोड, गोखले रोड,उत्तर व दक्षिण, रानडे रोडवरून दादर चौपाटीवरील हिंदू स्मशानभूमीत- आताच्या चैत्यभूमीत सायकांळी ६ वाजता पोहोचली. चार मैल लांबीच्या या त्यांच्या अंत्ययात्रेत देशभरातून १५ लाखांवर लोक सामील झाले होते. दि.७ डिसेंबर १९५६ रोजी सायंकाळी ७.५० वाजता त्यांच्यावर मुंबई मध्ये बौद्ध पद्धतीने अंत्यसंस्कार करण्यात आले. मुंबई हे त्यांच्या जीवनकार्यातील अधिकांश काळ मुख्यालय होते आणि तेथेच त्यांचे अजूनही सर्वात जास्त अनुयायी होते. मुंबई शहरातील ती सर्वात मोठी अत्यंयात्रा होती. त्यानंतर दहनसंस्कारास उपस्थित राहिलेल्यापैकी एक लाख लोक त्यांच्या अस्थींबरोबर तैनातीने राजगृहापर्यंत गेले. परंतु दहनभूमी सोडण्यापूर्वी त्यांनी आंबेडकरांच्या इच्छेची पूर्ती करण्यासाठी म्हणून बौद्ध धम्माचा स्वीकार करण्याचा आग्रह धरला. त्यानुसार दीक्षा समारंभाचा कार्यक्रम होऊन तेथे उपस्थित असलेल्या बौद्ध भिक्खूंपैकी महापंडित डॉ.आनंद कौसल्यायन यांनी त्रिशरण व पंचशील देऊन त्याच ठिकाणी १० लाख लोकांना बौद्धधम्माची दीक्षा दिली. एकाच वेळी दहा लक्षांवरील लोकांचे धर्मांतर हे जगातील सर्वात मोठे सामूहिक धर्मांतर होते. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे दिल्लीमध्ये आपल्या निवासस्थानी महापरिनिर्वाण झाले होते, तेथे भारत सरकारने डॉ.आंबेडकर राष्ट्रीय स्मारक निर्माण केले आहे. याला महापरिनिर्वाण स्थळ म्हणूनही ओळखले जाते. १३ एप्रिल २०१८ रोजी भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते स्मारकाचे लोकार्पण करण्यात आले. या स्मारकाच्या इमारतीची रचना पाने उघडलेल्या भारतीय संविधानाच्या पुस्तकाप्रमाणे असून हा आकार ज्ञानाच्या शोधाचे प्रतीक आहे.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची ओळख केवळ दलितांचे कैवारी, राज्यघटनेचे शिल्पकार म्हणूनच सांगितली जाते. परंतु डॉ.आंबेडकर यांनी शेतकऱ्यांसाठी महत्त्वाचे कार्य केले. शेतकऱ्यांच्या समस्या सोडवून उपाययोजना करण्यासाठी पाणी, वीज आणि शेतीचा सूक्ष्म विचार केला. डॉ.आंबेडकर यांना ग्रामीण समाजव्यवस्थेची जाण होती. तितकेच शेतीबद्दलही भान होते. शेतीचे चित्र बदलले पाहिजे, याबाबत ते आग्रही होते. देशात शेती, शेतकरी आणि शेतीशी संबंधित समूहाचा विचार छत्रपती शिवाजी महाराज, शिक्षणसम्राट महात्मा फुले, छत्रपती शाहू महाराज आणि डॉ.आंबेडकर यांनीच केला. अवघे २७ वर्षे वयात डॉ.आंबेडकरांनी देशातील शेती आणि शेतकरी यांचे संशोधन करून लहान शेतकऱ्यांच्या समस्या आणि उपाय हा शोधनिबंध लिहिला. शेतीसाठी जमीन व पाणी हे मुख्य घटक आहेत. पाण्याशिवाय शेतीचा विकास अशक्य आहे. शेतकऱ्याला शाश्वत पाणी मिळणे गरजेचे आहे. पाण्याशिवाय उत्पादकता वाढणे आणि शेतकऱ्यांचा आथक स्तर उंचावणे शक्य नाही हे त्यांनी ब्रिटिश सरकारच्या निदर्शनास आणून दिले होते. शेतीला उद्योग मानून पायाभूत सुविधा पुरवून शेतकऱ्यांचा आथक विकास झाला पाहिजे. शेतकरी समृद्ध झाला तरच शेतीशी निगडित सर्व घटकाला या आर्थिक सक्षमतेचा फायदा होईल, असे त्यांचे मत होते.

शेतकऱ्यांच्या प्रश्नावर चिंतन करून, विचार मांडून आणि त्यांच्यासाठी चळवळी उभ्या करून या देशातील शेती, शेतकऱ्यांचे प्रश्न डॉ.आंबेडकरांना संपवायचे होते. यासाठी त्यांनी २५ हजार शेतकऱ्यांचा देशातील पहिला मोर्चा काढला. एवढेच नाहीतर त्यांच्या नेतृत्वात ७ वर्षे दीर्घकाळ शेतकऱ्यांचा संप झाला. जाती विसरून सर्व जण एकत्र आल्यास देश तुमच्या हातात येईल, असे ते सांगत. खोती पद्धतीच्या विरोधात त्यांनी लढा दिला. देशाचे पहिले पाटबंधारेमंत्री झाल्यानंतर डॉ.आंबेडकरांनी शेती आणि शेतकरी यांच्यासाठी अनेक महत्त्वाचे निर्णय घेतले, तसेच देशाचे पहिले ऊर्जामंत्री झाल्यानंतर त्यांनी पहिला ऊर्जा आयोग स्थापन करीत वीज आणि पाण्याचे नियोजन केले. उद्योगांना वीज देताना कृषी उद्योगांना प्राधान्य दिले. डॉ.आंबेडकरांमुळे देशातील स्त्रियांना मताचा व समतेचा अधिकार मिळाला. कामगारांना न्याय मिळवून देऊन त्यांना सशक्त बनवले. डॉ.आंबेडकर सर्व देशाचे नेते होते. आजही त्यांच्या मार्गदर्शक विचारानुसार अनुकरण करणे फार महत्त्वाचे वाटते. खरे तर त्यांच्या कार्याची यादी प्रचंड मोठी आहे; मी ते लिहू म्हटले तर माझे अख्ये आयुष्यच संपून जाईल, पण त्यांची कार्यमहती पूर्ण काही लिहू शकणार नाहीच!

# अहंकार विवाहाला घटस्फोटाच्या उंबरठ्यावर घेऊन जातो



गणेश खाडे
संपर्क क्र. 9011634301

आधुनिक केसरी

**विवाह हा संस्कार आहे याची जाणीव ठेवली तर संस्कार व संस्कृती याची जपणुक नक्कीच होईल.पण दुर्दैवाने याचा विसर पडल्याने संस्कारांची मुळं कमकुवत झाली आहेत त्याचा थेट परिणाम वैवाहिक जीवनावर होत आहे.थोड्याफार प्रमाणात समजून घेण्यासाठी कोणीही तयार नाही माघार नेमक कोण घेणार याच अहंकारातून अनेक वैवाहिक जोडीदार घटस्फोटा पर्यंत पोहचत आहेत. सामाजिक व्यवस्था आणि परंपरा यावर त्या त्या युगातील विविध घटकांचा परिणाम हा होत असतो.युग जितकं संस्कारक्षम असतं तितकेच नाते हे संबंध मजबूत असतात. आणि जसं जसं संस्कारांचा प्रभाव कमी होतो तसं तसं नातेसंबंध हे कमकुवत आणि दुबळे होत असतात.तस पाहिलं तर त्या त्या युगाचा प्रत्यक्ष अप्रत्यक्ष रित्या सामाजिक जीवनावर प्रभाव निर्माण होत असतो.**


सध्याच सामाजिक जीवन हे आर्थिकदृष्ट्या प्रगतशील तर आहेच पण तंत्रज्ञान युगाच्या दिशेने आपण प्रचंड मोठी झेप घेतोय. मात्र सामाजिक पातळीवर विद्यमान स्थितीत नाते संबंध हे खुप झपाट्याने बिघडत चालले आहेत.हे वास्तव कोणीही सहजासहजी नाकारू शकत नाही.आणि याचे थेट वैवाहिक जीवनावर प्रतिकुल परिणाम होत आहेत. घटस्फोट अथवा अलग होण्यासाठी काही तरी गंभीर स्वरूपाचे कारण असले पाहिजे.पण वास्तव पाहिलं तर गंभीर कारण नसताना फक्त अंहकार बळावला कि तो नात्यांचा बळी घेऊनच स्थिरावताना आपण सगळीकडे पाहतोय.अंहकार आपला मुख्य शत्रु असला तरी आपलं खोटं खोटं समाधान होण्यासाठी आपलीच बाजु सत्याची आहे.अस अहंकार आपल्याला नेहमीच जाणीव करून देत असतो आणि आपण याच चक्रव्युहात आडकतो.आपणच खरे असं अंहकार आपल्याला ठामपणे बजावतो. अणि आपण तेच सत्य मानतो मग आपला शत्रु असणारा अंहकार आपण त्याला आपला सगळ्यात जवळचा हितेशी समजतो . आणि संपुर्ण जीवनाची वाट लागली तरी आपल्याला अंहकार मागे फिरू देत नाही. आपली पुरती वाट लागल्यानंतर अंहाकार निघून जातो.पण तोपर्यंत सगळं आभाळ फाटलेले असतं . शिल्लक काही उरत नाही . आणि म्हणून अंहकाराचा कडेलोट केला तरच आपण आपल्या जीवनात असणारे आपले अनेक नातेसंबंध हे टिकवु शकतो.आणि म्हणून प्रत्येकाने सध्याच्या युगात नातेसंबंध व्यवस्थित टिकविण्यासाठी अंहकाराच सिमावलोघंन केलच पाहिजे.आणि आपल्या जीवनात अंहकार असंच आपलं रूप विस्तार करत राहिला तर मग मात्र आपलं जीवन प्रभावित झाल्याशिवाय राहणार नाही.नाते कौटुंबिक असो कि वैवाहिक



जीवनातील असो त्याचं एक अनन्य साधारण असं महत्व असत.पण हे महत्व सध्या कमी झालं आहे का आणि वैवाहिक जीवनातील घटसफोटांच प्रमाण चिंताजनक झाल तर आहेच पण दिवसेंदिवस हे प्रमाण अधिक वाढत आहे आणि घटस्फोट हि एक सामाजिक जीवनातील गंभीर समस्या म्हणून उदयाला येत आहे. साधारणतः नात्याचे दोन प्रकार असतात एक महणजे शाश्वत नाते संबंध आणि दुसरे म्हणजे भौतिक नाते संबंध शाश्वत नाते संबंध हे कोणत्याही प्रकारचा मोह,माया स्वार्थ या पालिकडे असतात आणि अशी नाती जीवनात खुप कमी नगण्य असतात.तर भौतिक नाते संबंध हे मोह,माय,स्वार्थ,या पायावर उभी असतात आणि म्हणून त्याचं भविष्य अंधकारमय असतं.आणि भौतिक जीवनात अहंकार हा प्रचंड असल्याने ,मी मोठा कि तु मोठा ,मी हुशार,कि तु हुशार,मी चांगला कि तु चांगला म्हणजे अगदी किरकोळ किरकोळ विषयावर वैचारिक मतभेद निर्माण होतात आणि या मतभेदाचे रूपांतर अंहकार हा मन भेदात करतो .मग आशा या भौतिक परिस्थिती मध्ये कोणीही एक पाऊल मागे येत नाही.आणि जर कोणी येण्याचा प्रयत्न केला तर अंहकार मागे येवु देत नाही . आणि मग सरतेशेवटी याची परिणती नातेसंबंध संपुष्टात येण्या मध्ये होते.आणि मग शेवटच्या क्षणा पर्यंत अंहकार कोणालाही माघार घेऊ देत नसल्याने नातेसंबंध संपुष्टात येतात.आणि सध्या वैवाहिक जीवनात असे प्रकार घडत असल्याने घटस्फोटाचे प्रमाण चिंताजनक बाब म्हणून उदयाला येत आहे. आणि यावर एकमेव प्रभावी उपाय हाच आहे कि अंहकार शुन्य जीवन जगता आलं पाहिजे.तर आणि तरच आपल्याला जीवनातील वेगवेगळे नातेसंबंध टिकुन राहतील.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739



# सरफगव्हाण येथे अज्ञाताने जाळला २२ क्विंटल कापूस

आधुनिक केसरी न्यूज

**घनसावंगी :** तालुक्यातील सरफगव्हाण येथील शेतकरी अण्णा काळे यांचा घरात ठेवलेला 20 ते 22 क्विंटल कापूस अज्ञात व्यक्तीने जाळल्याची घटना (दि. ५) मंगळवारी रोजी सकाळी सुमारे आठ वाजता घडली. अण्णा काळे यांनी शेतात शेत माल ठेवण्यासाठी घर बांधले असल्याने ते शेतातच माल ठेवत होते. परंतु (दिनांक ४) सोमवार रोजी शेतातील घराला कुलूप लावून ते घरी परतले व( दिनांक ५) मंगळवार रोजी त्यांच्या शेजारील शेतकऱ्यांना त्यांच्या घरातून दूर निघत असल्याचं दिसून आल्याने अण्णा काळे यांना त्यांच्या गावातील घरी येऊन त्यांच्या शेजाऱ्यांनी सांगितले की तुमच्या शेतातील कापुस ठेवलेल्या घरातुन धुर निघत आहे. यानंतर अण्णा काळे व त्यांचे दोन्ही मुलांनी शेताकडे धाव घेऊन बघितले असता घरातून धुर निघत होते व दरवाजा उघडून बघितले तर संपूर्ण कापूस जळून खाक झालेल्या अवस्थेत होता. ही घटना घडल्याने परिसरातील शेतकऱ्यांमध्ये चिंतेचा विषय झाला आहे. ह्या झालेल्या घटनेविषयी श्री अण्णा काळे यांनी घनसावंगी पोलीस स्टेशन येथे अज्ञात व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल केलेला आहे. पुढील कारवाई पोलीस करत आहे.

# फुलंब्री शहरात स्थानिक पोलिसांच्या आशीर्वादाने अवैध धंदे जोमात

आधुनिक केसरी न्यूज




**सुधाकर जेठे**

**फुलंब्री :** शहरात फुलंब्री पोलीस ठाण्याच्या स्थानिक पोलिसांच्या आशीर्वादाने अवैध धंदे जोमाने सुरू आहे, या अवैध धंदे तात्काळ बंद करा अशी शहरातील नागरिक करीत आहेत. फुलंब्री शहरात गेल्या काही महिन्यांपासून अवैध देशी दारू, सट्टा मटका, सोरट, काला पिला, गुटखा, अवैध वाळू उपसा यासह अनेक अवैध धंदे सुरू आहे.

या अवैध धंद्यामुळे गोरगरीब असलेले नागरीक कंगाल होत आहे. तर अवैध धंदे धारक मालामाल होत आहे.

फुलंब्री च्या बसस्थानक परिसर, खुलताबाद रोडवरील देवगिरी सहकारी साखर कारखाना परिसर, औरंगाबाद रोडवर, फुलंब्रीचा टी पॉइंट परिसर, सिल्लोड अजंठा रोडवर या सह अनेक ठिकाणी अवैध रित्या देशी दारू, मटका जुगार अड्डे,काला पिला गुटखा विक्री होत आहे. याकडे फुलंब्री पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक रवींद्र निकाळजे यांच्यासह आदी पोलीसांचे जाणुनबुजून साफ दुर्लक्ष करत आहे. या अवैध धंद्याला हाप्तेखोरीला अर्थीक पाठबळ मिळत आहे.यामुळेच ये अवैध धंदे बंद होईना अशी चर्चा सर्वसामान्य नागरिकांमध्ये रंगत आहे. काला पिला ऑनलाइन मटका व पत्त्याच्या जुगारात नागरिक पैसे हारत कंगाल होत आहे. याकडे औरंगाबाद जिल्हा ग्रामीण अधीक्षक यांनी लक्ष देऊन फुलंब्री तालुका व शहरात सुरू असलेल्या अवैध धंद्याला लगाम लावावे अशी मागणी फुलंब्री शहरातील नागरिक करीत आहेत. फुलंब्री शहरातील जामा मस्जिद परिसरातील देशी दारूची दुकान दुसरीकडे स्थलांतर करावे फुलंब्री शहरातील जामा मस्जिद व दत्त मंदिर परिसरातील देशी दारूची दुकान गावातुन हद्दपार करावे. या देशी दारूच्या दुकानामुळे परिसरातील महिला व लहान मुलांना व भाविकांना त्रास सहन करावा लागत आहे. देशी दारू पिऊन दारुडे याच ठिकाणी पडतात व महिलांना न बघता घाण घाण शिवीगाळ करतात. अशामुळे परिसरातील महिला व लहान मुलांमध्ये भितीचे वातावरण निर्माण होत आहे. या कडे राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या अधिकाऱ्यांनी लक्ष देत गावातील देशी दारूची दुकान गावातुन हद्दपार करावे अशी मागणी फुलंब्री शहरातील नागरिक व भाविक करतात आहे.नसता देशी दारूची विक्रीचा परवाना रद्द करत कारवाई करण्यात यावे अशी मागणी केली जात आहे.

# पवना, इंद्रायणी, मुळा नद्या झाल्या 'गटारगंगा'

आधुनिक केसरी न्यूज

**पिंपरी:** शहरातून वाहणाऱ्या पवना, इंद्रायणी आणि मुळा या तीन नद्यांचा प्रदूषणाचा मुद्दा ऐरणीवर आला आहे. उद्यापासून सुरू होणाऱ्या हिवाळी अधिवेशनात प्रदूषणाचा मुद्दा गाजण्याची चिन्हे आहेत. नद्यांमधील जलपर्णी, जलप्रदूषणाबाबत आमदारांनी प्रश्न विचारले आहेत. पिंपरी-चिंचवड शहरातून पवना, इंद्रायणी आणि मुळा या तीन नद्या वाहतात. पवना नदीची महापालिका हद्दीतील लांबी २४.३४ किलोमीटर, इंद्रायणी नदीची एकूण लांबी २०.८५ किलोमीटर आहे. तर, मुळा नदी शहराच्या सीमेवरून दहा किलोमीटर अंतर वाहते. तळवडेपासून चऱ्होलीपर्यंत इंद्रायणी नदीचे प्रदूषण वाढले आहे. तर, किवळेपासून दापोडीपर्यंत पवना नदीचे प्रदूषण वाढले आहे.

# भाजपा महिला पदाधिकाऱ्यांची बैठक



आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** भारतीय जनता पार्टी महिला मोर्चा प्रदेश अध्यक्षा मा. चित्राताई वाघ, छत्रपती संभाजीनगर उत्तर ग्रामीण भाजपा जिल्हा अध्यक्ष श्री. सुहासभाऊ शिरसाठ यांच्या सूचनेनुसार छत्रपती संभाजीनगर उत्तर जिल्हा ग्रामीण 05 मंडळाच्या बैठका घेण्यात आली. भाजपा प्रदेश सरचिटणीस सौ.मीनाताई मिसाळ यांच्या अध्यक्षतेखाली जेष्ठ नेत्या मंगल ताई वाहेगावकर,जिल्हा सरचिटणीस सौ.ऐश्वर्याताई अभिषेक पा. गाडेकर, महिला मोर्चा छत्रपती संभाजीनगर उत्तर जिल्हा ग्रामीणच्या जिल्हा अध्यक्षा सौ.पुष्पाताई प्रकाश काळे, भाजपा फुलंब्री तालुका अध्यक्षा सौ.सविताताई नवले यांच्या उपस्थितीत त्यांच्या निवासस्थानी फुलंब्री येथे बैठक येथे संपन्न झाली.

यावेळी आयोजित केलेल्या संघटनात्मक आणी कामकाजाच्या बैठकीला जिल्हा अध्यक्षा सौ.पुष्पाताई काळे यांनी मार्गदर्शन करून कामाचा आढावा घेतला. तसेच आगामी निवडणुका डोळ्यासमोर ठेऊन आपण संघटनात्मक बांधणी करावी. सरकारच्या विविध योजनांची माहिती तळागाळातील लोकांपर्यंत पोहचवावी ,पक्षाचे अभियान राबविणे, सरल अँप डाउनलोड करणे,नवीन मतदार नोंदणी करून घेणे इत्यादीच्या सूचना केल्या. यानंतर महिला पदाधिकारी यांना सौ.मीनाताई मिसाळ, श्रीमती.मंगलाताई वाहेगावकर( मा.जिल्हाध्यक्षा), सौ.ऐश्वर्याताई गाडेकर (जिल्हा सरचिटणीस) यांच्या हस्ते नियुक्ती पत्र वाटप करण्यात आले.



भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना भारतीय जनता पार्टीच्या प्रदेश कार्यालयात बुधवारी महापरिनिर्वाण दिनानिमित्त अभिवादन करण्यात आले. यावेळी प्रदेश उपाध्यक्ष व माजी आमदार श्रीमती स्मिता वाघ, प्रदेश मुख्यालय प्रभारी रवींद्र अनासपुरे, भाजपा मुंबई सरचिटणीस संजय उपाध्याय, प्रदेश प्रवक्ता अवधूत वाघ, प्रदेश कार्यालय सचिव मुकुंद कुलकर्णी आदी उपस्थित होते.

महाराष्ट्र Business Katta












# भारतीय नौदलाच्या कसोटीचा काळ

आधुनिक केसरी

**भारताच्या तिन्ही संरक्षण दलांच्या सतत संपर्कात राहण्याचे काम भारताचे पंतप्रधान करत आहेत. या दलांच्या आत्मविश्वासात वाढ निर्माण होण्यासाठी याची आवश्यकता आहे. त्याचाच परिपाक म्हणून की काय नौदल दिनाचे औचित्य साधत छत्रपती शिवाजी महाराजांच्या भव्य अशा ४३ फूट उंच पुतळ्याचे ( सिंधुदुर्ग जिल्ह्यातील मालवणच्या राजकोट किल्ल्यावर ) आणि नौदलाच्या ध्वजावरील राजमुद्रेचे अनावरण नौदल दिवसा निमित्त पंतप्रधानांच्या हस्ते झाले. हा एक आगळावेगळा भाग प्रथमच करण्यात आला. अर्थातच हे सर्व सुखावणारे असले तरी आपल्या शेजारी काय चालू आहे ? याकडेही तितकेच लक्ष असणे अत्यावश्यक आहे. म्हणजे आपण केवळ आपल्या राजकीय जगात रममाण राहू नये. इतकेच सांगणे आहे.**

अद्याप पुष्कळ कार्य करणे शेष आहे. आता कुठे आरंभ झाला आहे, असे म्हणता येईल. त्यामुळे अधिक हुरळून न जाता कार्य करत राहण्याकडे लक्ष केंद्रित असले पाहिजे.

छत्रपती शिवाजी महाराजांनीच नौदलाचा पाया रचला. भारतीय नौदलाच्या पदांचे भारतीय संस्कृतीनुसार होणारे नामकरण नक्कीच कौतुकास्पद आहे. कारण गुलामगिरीची जोखड बाजूला फेकणे आणि स्वतःचे स्वतंत्र अस्तित्व निर्माण करत ताठ मानेने जगणे म्हणजे काय ? याचा आदर्श पाठ छत्रपती शिवरायांनी घालून दिला आहे. जगातील विविध देशांना महाराजांची ओळख आहेच. मात्र त्यांची कीर्ती अधिक पसरवण्यासाठी आणि ते नक्की कोण होते ? ही जिज्ञासा जगाच्या मनी निर्माण करण्यासाठी पदांचे भारतीयकरण करणे महत्त्वाचे वाटते. यामुळे आंतरराष्ट्रीय पातळीवर वाद निर्माण होणे, संबंधांत कटुता येणे वगैरे प्रश्न क्षुल्लक आहेत. त्याचा बाऊ करण्यात काहीच तथ्य नाही. भारत हा स्वतंत्र देश आहे. त्याला त्याच्या वंदनीय, आदर्श व्यक्तीचे कार्य डोळ्यासमोर ठेवून वाटचाल करायची असेल तर त्यात चूक असे काहीच वाटत नाही. उलटपक्षी जगाला नौदलाचे खरे संस्थापक कोण आहेत ? हे भारताकडून सांगण्यात विलंबच झाला, असे का म्हणू नये. पिकत तिथे विकत नाही. असे म्हणतात तेच इतके वर्ष खरे करून दाखवले जात होते. मात्र आता नौदलांतील पदांचे भारतीय संस्कृतीनुसार होणारे नामकरण हेच दर्शवते की, भारताने त्याच्या वंदनीय महापुरुषाची नोंद घेऊन जगासमोर त्यांचे कार्य ठळकपणे आणण्यासाठी जोरकस प्रयत्न चालू केले आहेत. यास नक्की यश मिळेल असे खात्रीपूर्वक वाटते. भारतीय नौदलाच्या गणवेशावर राजमुद्रा असणार आहे. या निमित्ताने सांगावेसे वाटते की, छत्रपती शिवाजी महाराज समजून घेण्यासाठी नौदलातील नौसैनिक, अधिकारी यांच्याकडून प्रयत्न झाले पाहिजे. तरच त्यांना त्याचे महत्त्व अधिक सखोलपणे मनावर बिंबण्यास नक्कीच साहाय्य होईल. अन्यथा त्याकडे केवळ



गणवेशात झालेला एक पालट म्हणून संकुचितपणे पाहिले जाईल. जुने तेच सोने असे म्हटले जाते. आता हे जुने पण कायम सोन्याप्राणे झळाळी असणारे राजमुद्रारुपी सूत्र गणवेशाच्या माध्यमातून धारण करण्यास मिळणार आहे. त्याचे सार्थक व्हावे. ते करण्याचे दायित्वच भारतीय नौदलकडे आलेले आहे.

छत्रपती शिवाजी महाराजांनी त्यांच्या काळात कोणतेही तंत्रज्ञान उपलब्ध नसताना गडकोट - जलदुर्ग बांधले, नौदलाचा केवळ पायाच रचला नाही तर समुद्रावर भक्कम वर्चस्व निर्माण केले. आता तर तंत्रज्ञान पुष्कळ प्रगत झाले आहे. म्हणजे भारत महाराजांच्या ज्ञानाचा आणि आताच्या प्रगत तंत्रज्ञानाचा कसा उपयोग करतो आणि सागरावर वर्चस्व प्रस्थापित करतो हे पाहणे उत्सुकतेचे असणार आहे. त्याची चुणूक आगामी काही वर्षांत जगाला दिसावी.

जागतिक स्तरावरील आव्हानांचा निकराने सामना करण्यासाठी भारतीय नौदलाला आधुनिकतेची कास धरण्यास पर्याय नाही. तत्कालीन सरंक्षण मंत्री आणि गोवा राज्याचे माजी मुख्यमंत्री मनोहर पर्रीकर यांनी भारताच्या संरक्षण दलाचे अत्याधुनिकीकरण करण्यासाठी उत्तम प्रयत्न केले. लोकप्रतिनिधी तंत्रज्ञान क्षेत्रातील असल्यास आणि त्याच्याकडे त्याच्या क्षमतेला पुरक असे खाते असल्यास त्याला कसा न्याय देता येतो हे पर्रीकर यांच्या कारकिर्दीत देशाने अनुभवले. मात्र त्यांच्या आजारपणामुळे त्यांच्या माध्यमातून भविष्यात जे अनेक सकारात्मक पालट संरक्षण दलात पाहण्यास मिळाले असते त्यास कुठेतरी अटकाव बसला, असे वाटते. तंत्रज्ञानात हातखंडा असलेल्या व्यक्तीची एक वेगळीच छाप असते. भारताच्या तुलनेत शेजारील चीन हा अत्यंत सामर्थ्यशाली तर आहेच. पण तो केवळ या ताकदीवरच विसंबून नाही. तर भारत समुद्रात नव्याने कुठे काही करत आहे का ? यावरही सतत लक्ष ठेवून आहे. त्यासाठी त्याने गेल्या काही वर्षांपासून श्रीलंकेच्या बंदरांचा उपयोग करण्यास आरंभ केला आहे. वर्षभरात विविध युद्ध नौका - पाणबुड्या श्रीलंकेच्या बंदरावर कशा येत राहतील याची चोख व्यवस्था चीनने केली आहे. चीन आणि श्रीलंका या देशांतील समुद्र स्तरावरचा प्रवास पुष्कळ मोठा आहे. मात्र तरीही तो प्रवास करून भारताची माहिती मिळवण्यासाठी चीनची कायम चालू असलेली धडपड लक्षवेधी आहे. भारताच्या समुद्र परिसरात कोण कोणती खनिज संपत्ती आहे ? तसेच उद्या भारताशी खटका उडाल्यास भारतावर दबाव निर्माण करण्यासाठी, त्याची नाकेबंदी करण्यासाठी कुठल्या भागात तत्परतेने युद्धनौका - पाणबुड्या तैनात करता येतील ? त्या दृष्टीने सागरी मार्गाचा नकाशा असणे आवश्यक आहे. हे लक्षात घेता चीन सतत भारताच्या सभोवती असणाऱ्या समुद्राच्या साहाय्याने भारताविषयीची माहिती संकलित करून ठेवण्यास अनन्य साधारण महत्त्व देत आहे. हे दुर्लक्षित करून चालणार नाही. युद्ध नौकेवरून करण्यात येणाऱ्या क्षेपणास्त्रांची चाचणी करण्याच्या काही दिवस आधी चीन त्याची युद्धनौका त्या चाचणी क्षेत्रात तैनात करतो. यामुळे भारताला एकदा क्षेपणास्त्र चाचणी रहित करावी लागली आहे. सदर क्षेपणास्त्र किती पल्ला गाठते ? किती कालावधीत लक्ष्याचा भेद करते ? इत्यादी माहिती संकलित करण्याकडे या माध्यमातून असलेला कल लपून राहत नाही. भारत हा चीनचा शेजारी आहे. मात्र भारताकडून चीनच काय तर कोणत्याही छोट्या देशांचीही हेरगिरी होत असल्याचे ऐकिवात नाही. मात्र चीन भारताच्या समुद्र किनारी करत असलेली हेरगिरी त्याचे मनसुबे नक्कीच चांगले नसल्याचे दर्शवणारी आहे. श्रीलंकेच्या बिकट आर्थिक काळात भारताने श्रीलंकेस भरघोस साहाय्य केले आहे. मात्र त्या बदल्यात त्या देशाकडून भारताने कधीच कोणतीही अपेक्षा ठेवली नाही. चीनकडून कर्ज घेणाऱ्या श्रीलंकेचा पुरेपूर उपयोग चीन करत आहे. श्रीलंकेच्या बंदरांवर स्वतःच्या युद्धनौका - पाणबुड्या यांना इंधन कसे मिळेल ? पाहिजे तितका कालावधी तिथे वास्तव्य कसे करता येईन ? यासाठी चीन श्रीलंकेचा व्यवस्थित उपयोग करून घेत आहे. चीनच्या भीती पुढे दबलेली श्रीलंका भारताच्या निषेधाला दुर्लक्षित करून चीनला अनुकूल असेच वागत आहे.

भारताच्या सभोवती असणाऱ्या देशांवर चीनची कशी मजबूत पकड आहे याची ही एक छोटी झलक म्हणावी लागेल. केवळ नाममात्र असलेले शेजारी देश काय उपयोगाचे ? जे भारताकडून साहाय्य घेतात मात्र चीनपुढे झुकतात. चीनच्या नौदलाचेच काय तर वायू आणि सैन्य दलाचे सामर्थ्यही भारताच्या तुलनेत कायमच उजवे राहिले आहे. त्यामुळे भारत त्या बलाढय देशाचा सामना कसा करणार ? हा प्रश्न आहे. भारत स्वतःच्या संरक्षण दलांची ताकद वाढवण्यासाठी प्रयत्नशील असल्याचे दिसत आहे. मात्र हा वेग वाढला पाहिजे. असेच मनोमन वाटते. कारण बलाढ्य चीनची मस्ती वाढण्यास त्याच्या संरक्षण दलांची ताकद तर कारणीभूत आहेच शिवाय सायबर चाचेगिरीतील लबाडीही त्याच्या बालस्थानात भर टाकत आहे. वाढते सायबर हल्ले हा जागतिक स्तरावर डोकेदुखीचा विषय ठरला आहे. शस्त्राविना बुद्धी चातुर्याने लढण्यात येणारे हे युद्ध तापदायकच आहे.

**जयेश राणे**
मुंबई

# विकासाचा रथ हाकणारे नेतृत्व : जयदत्त अण्णा



माधव अरुणराव डाके
संपर्क क्र. 9730115620

आधुनिक केसरी

**गोरगरिबांच्या मुलांना ज्यांनी पोटापाण्याला लावले. शेती व्यवसायात राबणाऱ्या बळीराजाला सुखी करण्यासाठी ज्यांनी जिल्ह्यात अनेक सिंचन प्रकल्प यशस्वीपणे उभा केले आणि राबवले. तुळशीच्या लग्नाला लागणारे उसाचे कांडे जिथे शोधून सापडणे अशक्य होते; त्या भागात ज्यांनी उसाची मळे फुलवले. बीड शहराबरोबरच गाव खेड्यातील रस्ते,नाल्या,पाणीपुरवठा योजना, पथदिवे उभारले. मंत्रिपदावर असताना बीड जिल्ह्यासाठी अधिकाधिक निधी खेचून आणला. सर्व जाती-धर्मांना सोबत घेत ज्यांनी सदैव बेरजेचे राजकारण केले.त्या जयदत्त अण्णांना राजकारणातून बाजूला सारणे हे नियतीलाच मंजूर नाही.**

म्हणूनच... 'जयदत्त क्षीरसागर ' या नावाचा दबदबा बीडच्या राजकारणात कायम असल्याचे दिसून येते.

अण्णांचा शांत स्वभाव, एखाद्या गोष्टीची सर्वांगीण दृष्टीने विचार करण्याची वृत्ती, त्यांच्या ठायी असलेली दूरदृष्टी आणि चिकित्सक बुद्धी, व जिल्ह्याच्या विकासाचा शुद्ध आणि प्रांजळ हेतू या अंगभूत गुणामुळेच आज आण्णांबद्दल मतदारांच्या मनात प्रचंड आदराची व सहानुभूतीची भावना निर्माण झालेली आहे. मागील विधानसभेला झालेली चूक येत्या विधानसभेत दुरुस्त करून जयदत्त अण्णांना प्रचंड बहुमतांनी मतदार राजा विधानसभेत पाठवणार... असा सूर आता मतदारातून गावोगावी येतो आहे.आपल्या शिक्षण संस्थांच्याच्या माध्यमातून मराठा सह विविध जाती धर्मांच्या लोकांना नोकऱ्यांची संधी आण्णा साहेबांनीच उपलब्ध करून दिली. त्यामुळे मतदारसंघातीलच नव्हे तर जिल्ह्यातील, परजिल्ह्यातील सुशिक्षित बेरोजगारांना देखील नोकऱ्या मिळाल्या. गजानन नागरी सहकारी बँक,सूतगिरणी, तालुका दुध संघ,तालुका



खरेदी विक्री संघ तसेच आदर्श शैक्षणिक संस्था आदी सारख्या संस्था मधूनही अण्णांनी बेरोजगारांना रोजगार उपलब्ध करून देऊन स्व.केशर काकूंचा सामाजिक व राजकीय वसा आणि वारसा सक्षमपणे जपला व जोपासला. आपल्या मंत्रिपदाच्या काळात बीड जिल्ह्यात अनेक ठिकाणी सिंचनाचे मोठमोठे प्रकल्प अण्णांच्या माध्यमातून राबवले गेले. इथला ऊसतोड कामगार ऊस बागायतदार झाला. शासनाकडून जिल्ह्यासाठी मोठ्या प्रमाणात निधी खेचून आणला. बीड बाजार समितीतील कोल्ड स्टोरेज,रेशीम उद्योग, व्यापारी गाळे, बाजार समिती अंतर्गत रस्ते यासह विविध कामे आदरणीय आण्णांनीच मार्गी लावली. विकासाची दृष्टी असणारा हा नेता आहे. नेहमी शेतकरी,कष्टकरी, शेतमजूर, दुर्बल घटक,वंचित यांच्या पाठीशी खंबीर उभार राहणारा हा नेता आहे. लोकांच्या सुखदुःखात रात्रंदिवस सहभागी होणारा हा नेता आहे. वेळप्रसंगी गाव खेड्यातील,वस्ती वा तांड्यावरील कोणाला रात्री अपरात्री वैद्यकीय मदतीचा लाभ मिळवून देणारा हा नेता आहे. शहराच्या आणि गावाच्या विकासासाठी अहोरात्र झटणारा हा माणूस पुन्हा आम्हाला आमदार-मंत्री झालेला पाहायचे आहे. अशी लोक भावना आता जनसामान्यांकडून ऐकायला मिळते आहे. राजकारणात सगळेच दिवस सारखे नसतात. कधी अनुकूल काळ येतो तर कधी प्रतिकूल परिस्थिती उद्भवत असते. पण अनुकूल काळात आण्णाना कधी सत्तेची धुंदी चढली नाही. आणि प्रतिकूल काळाने ते कधी खचलेही नाहीत. सदैव लोकांच्या सेवेसाठी ते स्थिर चित्ताने लोकांची कामे करत राहिले.

ज्ञानेश्वरीच्या दुसऱ्या अध्यायातील कृष्णाने अर्जुनाला सांगितलेली स्थित प्रज्ञाची लक्षणे आण्णांमध्ये दिसून येतात. सर्व जाती,धर्म समूहांना न्याय देण्याची भूमिका बाळगणारा, सर्वांना सोबत घेऊन चालणारा हा दिलदार मनाचा नेता बीड विधानसभेत पाठवून मंत्री झालेला पाहण्याची उत्सुकता आता मतदारां मध्ये प्रचंड प्रमाणात दिसून येत आहे. आज अण्णांचा शुभ वाढदिवस आहे. या वाढदिवसानिमित्त परमेश्वराकडे एवढेच मागणे आहे की, हे परमेश्वरा लोकांसाठी धडपडणाऱ्या या आमच्या नेत्यास उत्तम आणि दीर्घ आरोग्य लाभू दे. अण्णा वाढदिवसाच्या लक्ष! लक्ष! शुभेच्छा!!

# आपण मात्र त्यांना चक्क वेडं ठरवून मोकळे होतो

आधुनिक केसरी

**ठाणे स्टेशनवर प्लॅटफॉर्म क्रमांक पाच वर रात्रीची शेवटची फास्ट बदलापूर ट्रेन सावकाश येऊन उभी राहीली. आधीच खचाखच भरलेली. त्यात काही उतरले, बरेच जण चढले. अगदी दाटीवाटी करून. गाडी सुटायची वेळ झाली. चढलेल्यांनी सुस्करा सोडला आणि अचानक दरवाजात एक कळकट मळकट कपड्यातील, अतिशय घाणेरडा वास येणारी स्रि घुसू लागली.**



गाडीत चढायला मिळत नव्हते पण तीच्या त्या दर्पाने एकेकजण नाक दाबून बाजूला होऊ लागले. गाडी चालू झाली. ती मात्र आरामात पुढे पुढे सरकू लागली. गर्दी आपोआप पांगू लागली.खचाखच भरलेल्या ट्रेन मध्ये वेळ आल्यावर जागा होऊ शकते हे मात्र सिद्ध झाले.

ती स्रि आतल्या मार्गिकेत जाऊन आरामात उभी राहीली. ना तीने कोणाकडे बघीतलं ना कुणाला काही बोलली. आजु बाजूचे लोक नाक दाबून कधीच बाजूला झाले होते. उभ्या उभ्या ती एकटीच अतिशय घाणेरड्या आणि लज्जास्पद शब्दात स्वतःशीच बडबडत होती. तीच्या डोक्यावर भयंकर परिणाम झाला होता हे स्पष्ट होतं. मध्येच विचित्र हसतही होती. तीच्या बोलण्याने आजूबाजूच्या लोकांनाही लाज वाटू लागली होती. कधी एकदा डोंबिवली स्टेशन येते आणि ही घाण उतरून जाते असे लोकांना झाले होते. तीच्या एकंदर अवतारा वरून आणि बोलण्या वरून तिच्यावर पुर्वायुष्यात भयंकर अन्याय अत्याचार झाले होते हे अगदी स्पष्ट होते.ती कोणाच्या तरी वासनेची शिकार झाली होती. समाजातील घाण अंगावर घेऊन मरता येत नाही म्हणून ती जगत होती. दिशा, निर्भया, प्रियंका अशी काही मोजकीच प्रकरणे आपल्या समोर येतात. त्यांचा गवगवा होतो. समाजात चिड निर्माण होते. अनेक आंदोलने होतात... पण समाजात पावलो पावली अशा दिशा,निर्भया, प्रियंका समाजातील घाण आपल्या अंगावर घेऊन मरण यातना भोगत असतात.हे आपल्या ध्यानी मनीही नसते.आपण मात्र त्यांना चक्क वेडं ठरवून मोकळे होतो.

**जयेश अ.माधव**
9167710614

# काजळमायामधील व्यक्त होणारे शैक्षणिक संदर्भ



किरण डोंगरदिवे
संपर्क क्र. 7588565576

आधुनिक केसरी

**काजळ माया हा जी ए कुलकर्णी यांचा 1973 मध्ये साहित्य अकादमी प्राप्त असलेला कथासंग्रह 1972 मध्ये प्रकाशित झाला. जी ए कुलकर्णी म्हणजे गुढ आणि अगम्य कथा असा सर्वसाधारण समज मराठी साहित्यामध्ये रूढ आहे. कवितेमध्ये ग्रेस, नाटकांमध्ये महेश एलकुंचवार आणि कथेमध्ये जी ए या साहित्यिकांवर दुर्बोधतेचा शिक्का बसलेला आपण सातत्याने पाहत आलो आहोत. ज्येष्ठ समीक्षक द भि कुलकर्णी यांच्या शब्दात जी ए यांच्या काजळमायाबद्दल सांगायचे तर या कथा प्रतीतीच्या दृष्टीने अतिशय बांधेसूद, अतिशय गोळीबंद, अतिशय दाट, सूक्ष्म आणि घट्टविणीच्या असतात, फार घाटदार असतात.**

संबंधित वर्णन सत्यात उतरलेले असल्याची परिपूर्ण कल्पना काजळमाया हा कथासंग्रह वाचत असताना आपल्याला येते. 10 जुलै 1923 रोजी जन्म झालेल्या गुरुनाथ आबाजी कुलकर्णी ह्यांच्या काजळमाया या कथासंग्रहामध्ये एकूण 14 कथा आहेत आणि प्रत्येक कथेची आपली स्वतःची एक अशी ओळख आहे. शैक्षणिक संदर्भात हा शोध घेताना प्रदक्षिणा ही कथा सुशिक्षित आणि सुसंस्कृत म्हणवल्या जाणाऱ्या समाजाचा आणि माणसांचा मुखवटा फाडणारी आहे असे आपल्या लक्षात येते. प्रदक्षिणा या कथेत दादासाहेब या राजकारणी आणि समाजकारणी अशा मातब्बर व्यक्तिमत्वाने शांताक्का या आपल्या पत्नी सोबत केलेली प्रातरणा लेखकाने मांडली आहे. दादासाहेब यांचे शांताबाईच्या लहान बहिणीशी म्हणजे जान्हवी हिच्यासोबत असलेले प्रेम संबंध, तिच्याच ओळखीतून त्यांनी शांताक्काच्या कॉलेजमध्ये कार्यक्रमासाठी जाणे आणि दादासाहेबांनी स्वतः रात्रीच्या मुक्कामात कॉलेजच्या विद्यार्थिनीवर हात टाकणे. या प्रसंगातून कॉलेजमधील विद्यार्थिनी शिक्षण घेण्यासाठी जातात, येणाऱ्या पाहुण्यांची सरबराई करतात मात्र पाहुणे सर्वसामान्य पुरुषाप्रमाणे या विद्यार्थिनीच्या शरीराचा लचका तोडण्यासाठी बुभुक्षित नजरेने त्यांच्याकडे पाहत असतात. या ठिकाणी स्त्री शिक्षणाच्या संदर्भाने काही प्रश्नचिन्ह उभे राहतात. स्त्रियांना शिक्षण घेण्याचा अधिकारच नाही का? आणि असेल तर प्रतिष्ठित म्हणाले जाणारे कॉलेजचे सन्माननीय पाहुणे विद्यार्थिनीवर असा अत्याचार कसा करू शकतात? असे प्रश्नचिन्ह घेऊन ही कथा पुढे सरकते. दादासाहेब आपल्या प्रतिष्ठेचा फायदा घेऊन गरोदर असलेल्या शांताबाई सोबत लग्न करण्यासाठी तयार नसतात. आपल्या लहान भावावर त्याने शांताबाई लग्न करावे म्हणून ते जबरदस्ती करतात मात्र राजाभाऊ त्याला विरोध करून दादासाहेबांना लग्नाला बसवतात. पुढे सुशिक्षित आणि धुर्त असे दादासाहेब आठ हजाराच्या आर्थिक घोटाळ्याचे खापर राजाभाऊंवर फोडतात आणि राजाभाऊ तुरुंगात जातात. आपली संपत्ती वाटून देताना दादासाहेब आपला मुलगा, आपली साळी आणि आपला भाऊ यांच्यात तिची वाटणी करतात, शांताबाईच्या नावावर मात्र ते काहीही ठेवत नाहीत. तसेच आपल्या पत्नीबद्दल आपल्या मुलाच्या मनात अगोदरच विष कालवून ठेवतात. एकंदरीत उच्चभ्रू म्हणवल्या जाणाऱ्या सुशिक्षित अशा स्वार्थी लोकांच्या मनोवृत्तीचे दर्शन घडवणारी ही कथा आहे. फार विस्ताराने आणि वेगवेगळ्या संदर्भानुसार जी ए ती कथा वाचकापर्यंत पोहोचवतात. शेवटचे हिरवे पान या कथेमध्ये सीताक्काच्या आठवणीत एका म्हातारीच्या जवळून जांभळे आणि बोरे विकत घेणारी शाळकरी मुलीची आठवण ताजी आहे. त्यावरून आपल्या बालपणातील शालेय जीवनातील आठवणींची साथ संगत आपल्याला आयुष्यभर पुरते असे जे आपल्याला सुचवतात. याच कथेमधील फकीरा सुताराच्या बोलण्यातून येणारे एक अवतरण फार महत्त्वाचे मला वाटते, माझं ऐकशील तर सांगतो बघ. माझा बा कधी शिकला नाही. मी कधी अंगठ्यापुढे गेलो नाही..... पण बघ, दोन-चार पावसाळे जास्त जगलो मी. असं सांगत असताना शालेय शिक्षण घेतले नाही तरी अनुभवातून घेतलेले जीवनाचे शिक्षण फार महत्त्वाचे आहे. त्या अनुभवातून आपण काही बोध घेतले पाहिजे असे लेखकाला म्हणायचे आहे. स्वप्न या आणखी एका कथेमध्ये सदानंदचा शेजारी कॉलेजमध्ये मेडिकल कमिशन मिळून लेफ्टनंट कर्नल न होता वडिलोपार्जित जमीन जुमला सांभाळत बसल्याचे संदर्भ वाचायला मिळतात.. घरगुती जबाबदाऱ्या आणि घर सोडून बाहेर न जाण्याची मानसिकता यामुळे उच्च शिक्षण घेऊन ही अनेक लोक आपल्या महत्त्वकांक्षा अर्ध्यावर सोडून देतात असे चित्र आपल्याला समाजात दिसते. सदानंद जेव्हा माईशी बोलत असतो, तेव्हा माई म्हणतात, पुस्तक वाचून संपलं, तर आणखी कोण आणून देणार दुसरं मला एवढ्या आतडयान, माझ्याजवळ तेवढे एकच पुस्तक आहे ही खंत आपल्या जीवनामध्ये इतर काहीही महत्त्वाचे नाही हे सांगण्यासाठी असले तरी, आपल्या समाज व्यवस्थेत स्त्रियां शिक्षित असल्या तरी जाणीवपूर्वक पुस्तक उपलब्ध करून देणारी मानसिकता समाजात नाही हे सुद्धा लक्षात घेणे गरजेचे ठरते. कसाब या कथेमध्ये येसूबाईने दोन घरचे भांडे घासणे सोडणे आणि तिच्या मुलाचे म्हणजे दत्तूचे शाळेत जाणे बंद होणे. या वाक्यातून आर्थिक परिस्थितीमुळे शिक्षणापासून वंचित राहणारी अनेक कामगारांची मुले डोळ्यासमोर उभे राहतात. दत्तू हा सोनू नावाच्या गरीब कथापात्राचा मुलगा आहे. आर्थिक विवंचनेत पीडलेला सोनू त्याची मुलगी कमळी हिचे शिक्षणही पूर्ण करू शकला नाही. मात्र व्यावसायिक शिक्षणाच्या साठी ती शिवण क्लासला जाते. आणि शरीर विक्रय करून पैसा कमावते. शिवणकामासारखे व्यावसायिक शिक्षण ही मध्यमध्यमवर्गीय समाजाची गरज होऊन बसली आहे हे लेखक सांगतात. मात्र शिक्षण घेण्यासाठी बाहेर पडणारे लेकरं अनैतिक मार्गाकडे जाऊन घराची प्रतिष्ठा मातीत मिळवत असल्याचे संदर्भही या कथेत येतात. जी ए कुलकर्णी यांचा जीवन दृष्टिकोन किती दूरवरचा होता हे त्यावरून लक्षात येते. भोवरा या कथेतही मंगल शाळेतून आली का? असा प्रश्न गोपाळच्या मनात निर्माण होतो त्यावरून गोपाळ हा नायक
हे शिक्षणासंदर्भात जागृत असल्याचे जाणीव लेखक सुरुवातीलाच करून देतात. मात्र त्याच कथेत मंगल शाळेत गेली नाही त्या मागचे कारण 'शाळेत होणाऱ्या कार्यक्रमात तिला शिक्षिकेने निळा कंबरपट्टा असलेला नवा पांढरा झगा नसेल तर शाळेत येऊ नको असे सांगितलेले असणे' हे कारण पुन्हा आर्थिक




परिस्थिती नसलेल्या मुलांनी शिक्षण घेऊ नये अशी व्यवस्था असल्याची जाणीव करून देणारे आहे. त्याचवेळी शिक्षकांनी इतर शैक्षणिक कार्यक्रम ठरवत असताना आर्थिक निकषावर पालकांना आणि विद्यार्थ्यांना अडचण निर्माण होणार नाही याची जाणीव ठेवण्याची आवश्यकता आहे हे आजपासून चाळीस ते पन्नास वर्षांपूर्वी जी ए कुलकर्णी यांनी आपल्या कथेतून सांगितलेले दिसून येते जे आज सर्वत्र लागू होते. या कथेमधून नमूताईचे खिडकीत उभे राहून शाळा सुटल्यावर परत जाणाऱ्या मुलाकडे पाहणे तिला तिच्या आजारी असलेल्या माधव नावाच्या मुलाची शाळा साध्य झाले नाही याची जाणीव करून देत अस्वस्थ करणारे असते त्याच वेळेस शाळेतून जाणाऱ्या मुलांनी एखादी वस्तू मिरवत गेले तर आपली मुलगी ती वस्तू मागेल आणि आपल्याला तिला ती देणे शक्य होणार नाही यामुळे गोपाळचे अस्वस्थ होणे वाचकांनाही अस्वस्थ करून जाते. एकंदरीत गोपाळ आपल्या शाळेत जाणाऱ्या मुलीच्या शिक्षणासाठी आपले दुपारचे जेवण बंद करतो इथपासून त्याने लेकराच्या शिक्षणासाठी केलेली तडजोड दिसून येते. अशा अनेक तडजोडी आजही अनेक पालक आपल्या पाल्याच्या शिक्षणासाठी करत असतात. पुनरपि या कथेत माई ही नायिका सुद्धा शिकलेली आहे लग्न होऊन घरात आल्यावर तिने वेगवेगळ्या कादंबऱ्या वाचल्या आहेत आणि त्या कादंबऱ्याचे पडसाद मनावर पडलेले आहेत. मात्र विलास मंदिर नावाचे एक पुस्तक वाचले की घरातील कोणी ना कोणी सहा महिन्याच्या आत मरण पावते असा अंदाज त्या घरात आहे. यावरून मला निळावंती नावाच्या एका पुस्तकाबाबत असलेल्या अशाच चर्चांची आठवण होते. एखादे पुस्तक वाचल्यावर कोणी मरण पावतो किंवा पुस्तकाच्या संदर्भातही काही अंधश्रद्धा आहेत याला सुशिक्षित माणसातील मागासने पण म्हणायचे का? असा प्रश्न या ठिकाणी उपस्थित होतो. औपचारिक शिक्षणाचे जसे काही संदर्भ जी ए कुलकर्णी यांच्या कथा मधून येतात तसेच काही अनौपचारिक, गुढ आणि दुर्बोध असे संदर्भ अंजन, दूत, गुलाम, रत्न आणि विदूषक अशा कथा मधून येतात. अंजन या कथेमध्ये भैरू ला त्याचा मेलेला बाप काही भविष्यात घडणाऱ्या घटना सांगतो, त्याचबरोबर कोणालाही माहित न झालेले भूतकाळातील काही रहस्य सांगतो. असा आशा असला तरी या कथेमध्ये डॉक्टरने भैरूच्या बायकोला तांदूळ कांडून घ्यायला बोलावणे आणि भैरुने त्यावर काही बोलतात त्रागा करणे हा सुशिक्षित माणसाने अडाणी माणसाला कमी लेखण्याचा प्रकार लेखकाने अधोरेखित केल्यासारखा वाटतो. त्याचप्रमाणे शाळेत जाणाऱ्या लहान मुलाच्या अंगावरील सोन्यामुळे त्याचा खून होणे या घटना माणसाच्या स्वार्थी प्रवृत्तीवर प्रकाश टाकणाऱ्या आहेत. डॉक्टर वकील ह्या शिक्षण घेतलेल्या लोकांचे संदर्भ देत रागाच्या भरात कायद्याचा जाणकार असलेला वकील सुद्धा खून करणार आहे. यासंदर्भातून शिक्षण किती घेतले तरी रागाच्या आणि भावनेच्या भरात माणसं चुकीचा निर्णय घेतात याकडे सुद्धा लेखकाने लक्ष वेधले आहे. याच कथेत भैरू अमानवी विद्यासारख्या प्रकारात जमिनीच्या आतील धन शोधण्यासाठी खटाटोप करून एका विद्येचा आधार दिव्यदृष्टी मिळवणारे अंजन तयार करतो मात्र किंचित चुकीच्या संदर्भामुळे त्याला स्वतःचा जीव गममावा लागतो त्यावरून विद्या कोणतीही असो तिचा योग्य वापर आणि उपयोग माहिती असणे गरजेचे असते. दूत या कथेचा विचार करता राजपुत्र आणि आर्यस्थविर हे धर्मगुरू यांच्यातील सत्ता संघर्षात आणि दूताला होणारे विस्मरण यातून जीवन विषयक तत्त्वज्ञान सांगणारी कथा आहे. राजपुत्र धर्मगुरू सत्ता संघर्षासाठी दूताचा अतोनात छळ करतात मात्र दूताचे हाल करणारा कालमुख नावाचा डोंब दूताला मरताना सुख आणि समाधान देतो मात्र दूत कालमुख याच्या मरणाचा निरोप घेऊन आलेला असतो. एकंदरीत ही कथा खूप गुंतागुंतीची असली तरी काळ आणि सत्ता संघर्ष यातील समीकरणांच्या नोंदीघेणारी आहे, त्याचप्रमाणे या कथेतील भिक्षू सर्पगृहामध्ये जीवाच्या आकांताने लपणाऱ्या माणसाचे हाल पाहून अघोरी आनंद मिळवतात ही संकल्पना सुद्धा धर्मगुरूच्याकडे शिक्षण घेणाऱ्या भिक्षूच्या निर्दयतेचे लक्षण दाखवणारी आहे. इतरांच्या मृत्यूवर उपरोधिक हसणाऱ्या अशा धर्मदायी शिक्षण घेणाऱ्या पिढीकडून भविष्यात निर्माण होणारे समाज घटक असे असतील याबाबत सुद्धा विचार करण्याची गरज या ठिकाणी निर्माण होते. गुलाम या कथेत गुलामांना द्यावयाची वागणूक या संदर्भात काही टिपणे आलेली आहेत त्यावरून एखाद्या प्रदेशाचा राजा जरी चुकून गुलाम झाला तर त्याला कसे वागवावे यासंदर्भात काही सिद्धांत आखलेले असायचे आणि लोक त्याप्रमाणे राहायचे हे आपल्या लक्षात येते. या कथेतील एक अवतरण फार महत्त्वाचे आहे ते म्हणजे परंपरेच्या दडपणा खालून निसटून तू वाळवंटात आलास हे सत्य आहे; परंतु मग त्या ठिकाणी नीतीनियम करण्याचा तुला जसा अधिकार आहे, त्याचप्रमाणे तो गुलामालाही आहे. म्हणूनच त्याने तुझे उंट मारले व स्वतःचे मुक्तता करून घेतली. तुझी नीती व त्याची नीती याच्या संघर्षात तू पराभूत झालास इतकच. प्रत्येक मनुष्य हा परिस्थितीजन्य निर्णय घेत असतो. एकाचा न्याय हा दुसऱ्यासाठी अन्याय असू शकतो. हे महत्त्वाचे शिक्षण किंवा सल्ला जीए कुलकर्णी यांनी या ठिकाणी दिलेला दिसून येतो.. कळसूत्र या कथेमध्ये सुद्धा प्रत्येक जमातीच्या सदगुणाच्या कल्पना निरनिराळे असतील; पण त्या त्या जमातीपुरता त्या सदगुणावर रात्र दिवस इतका भर दिला जातो, की बालपणापासूनच आपलं मत त्या साच्याचा आकार धारण करत, त्याच विचाराचे गुलाम बनत, म्हणूनच त्याच्या अनुरोधान आपल्या आवाक्यातलं एखादं संस्कृत करायला फारशी बुद्धी किंवा धैर्य लागत नाही अशा विचारातून समाजाच्या ज्ञानाच्या कक्षा आणि परंपरा वेगवेगळ्या असल्याची स्पष्ट धारणा लेखकाने सांगितली आहे. तसेच आपण लोकांना आपल्या तालावर चालवतो या जाणिवेच्या सुखापेक्षा आपण कुणाच्या तरी चालावं चालतो ही जाणिव फार भयंकर असल्याची स्पष्टोक्ती या कथेतून चर्चिली गेली आहे. एकंदरीत जी ए कुलकर्णी या नावातील गूढार्था प्रमाणे काजळ माया या कथासंग्रहातील शैक्षणिक संदर्भ कधी दुर्बोध आणि अलौकिक पातळीवरून वाचकांना भेटतात तर कधी सर्वसामान्य संदर्भातून शिक्षणाचे महत्व अधोरेखित करतात.

# वडिलांच्या वेदना कळणार केव्हा?



बबन गुळवे
मुंबई. मो.९७३०९३९७३२

आधुनिक केसरी

**रात्रीचे आठ वाजले आहेत. सर्जेराव घरात एकटेच लोखंडी पलंगावर बसून छताकडे पहात आहेत.डोक्यात विचारचक्र गरगर फिरतेय.भूक लागलीय पण जेवणाची इच्छा होत नाही. छताकडची नजर भिंतीवर लावलेल्या पत्नीच्या फोटोकडे गेली.एक वर्षापूर्वी पत्नीचे निधन झालेलं.एकुलता एक मुलगा त्याच्या बिऱ्हाडासह नोकरीनिमित्त बाहेरगावी शहरात वास्तव्यास आहे.शेजारच्या गावात दिलेली मुलगी सर्जेरावांसाठी दोन वेळच्या जेवणाचा डबा पाठवून देतेय. शिळंपाकं अन्न खाऊन सर्जेराव एकेक दिवस कसेतरी काढताहेत.**

. नातवांसोबत राहून उरलं सुरलं जीवन जगण्याचा त्यांची खूप इच्छा आहे.परंतु हे त्यांच्या नशिबी मुळीच नाही.सुनबाईचा स्वभाव तापट आहे आणि मुलगा तिच्या शब्दांचा पक्का पाईक आहे. बिच्चारे सर्जेराव एवढ्या मोठ्या दुनियेत एकटे पडले आहेत. अंतरीच्या वेदना त्यांना रक्तबंबाळ करत आहेत!

रविंद्र नावाचे एक गृहस्थ.मुंबई मधील एका नामांकित कंपनीत चाळीस वर्षे नोकरी करुन नुकतेच सेवानिवृत्त झाले आहेत.दरमहा येणारा पगार पत्नीच्या हातात मुकाट्याने देण्याची तंबी पत्नीने देऊन ठेवली होती.घरात पत्नीचा कारभार व दरारा होता.त्यामुळे पैसा आला किती आणि गेला किती हे रविंद्रला काहीच माहीत नाही.ते सेवानिवृत्त झाल्यावर तिसऱ्याच दिवशी पत्नी व मुलाने त्यांना सवाल केला -'तुम्ही आमच्या साठी नेमके काय केले ?'हे ऐकून रविंद्रच्या पायाखालची जमीन सरकली.खरेतर रविंद्रला काही न विचारता दरमहा येणारा पगार पत्नीने व मुलाने खर्च केलेला. रविंद्रला न विचारता त्यांनी एक व्यवसायही सुरु केला होता.नेमके त्या वेळी कोरोना रोगामुळे लॉकडाऊन लागले अन् त्यांचा व्यवसाय बुडाला. आणि सेवानिवृत्त झाल्यावर घरात बसून कटकट ऐकून घेण्यापेक्षा रविंद्र यांनी इच्छा नसतानाही एका कंपनीत वॉचमनची नोकरी स्वीकारली आणि तिकडे गेले सुध्दा.म्हणजे उतारवयात देखील त्यांच्या नशिबात सुख नाही,आराम तर नाहीच नाही.त्यांचे हृदय मात्र वेदनेने ठणठणत आहे!

साडेतीन एकर शेतीचे मालक असलेले रामराव जिंदगीभर शेतात काम करीत आहेत. कधीकधी दुसऱ्यांच्या शेतात मजुरीचे काम करुन त्यांनी प्रपंच चालवला आहे.आता ते थकले आहेत. पुर्वीच्या सारखा कामाचा उरक त्यांना जमत नाही. तरीही ते पत्नी सोबत शेतात राबत आहेत.त्यांची हृदयस्पर्शी वेदना अशी की त्यांना दोन मुले आहेत. दोघेही व्यसनी.या जगात जेवढी व्यसने करता येतात तेवढी व्यसने त्यांच्या दोन्ही मुलांना जडली आहेत. स्वतःच्या शेतात कष्ट न करता मिळेल ते काम करायचे. आलेली मजुरी व्यसनांवर खर्च करायची आणि झिंगत राहायचे हे नेहमीचेच झाले आहे.दोन्ही मुलांचे लग्नाचे वय निघून गेले आहे.दोघेही थोराड दिसत आहेत.रामराव व त्यांच्या पत्नीला हेच दुःख आतून पोखरत आहे!

या जगात असे कितीतरी वडील आहेत जे मुलांच्या दुष्कृत्यांमुळे वेदनेने विव्हळत असतात.



आपल्या मुलांचे चांगलेच व्हावे असे सगळ्या बापांना वाटत असते.परंतु वेळोवेळी वडिलांनी दिलेले शहाणपणाचे डोस आम्हाला बिनकामाची कटकट वाटते.शरीर थकले तरीही वडील जीवनभर कष्ट उपसतात याचे आम्हाला काहीच वाटत नाही. वडिलांनी प्रत्येक वेळी त्यांचे कर्तव्य पार पाडलेले असते परंतु मुलगा या नात्याने आम्ही आपल्या वडिलांना समजून घेण्याचा कधीच प्रयत्न करत नाही. आणि मुलगा या नात्याने वडिलांसाठी कधी आपले कर्तव्य निभावत नाही हीच खरी मोठी शोकांतिका आहे! आपण आपल्या वडिलांना कधी समजून व उमजून घेणार आहोत की नाही ?

# पोवारी बोलीचा नखशिखांत साज - मयरी



गुलाब बिसेन
संपर्क क्र. 9404235191

आधुनिक केसरी

**सर्जनशील लेखनाने मराठी साहित्यात आपली वेगळी ओळख निर्माण करणारे कवी इंजी. गोवर्धन बिसेन हे 'गोकुल' या साहित्यिक नावाने मराठी सोबतच पोवारी आणि हिंदी भाषेतही सातत्याने लेखन करत आहेत. तिन्ही भाषांवरील त्यांचे असलेले प्रभुत्व त्यांच्या लेखनातून परावर्तीत होते. व्यवसायाने जलसंधारण विभागात राजपत्रीत अभियंता असलेल्या कवीने आपल्या सर्जनशील लेखनाने तिन्ही भाषांतील लेखनावर आपली वेगळी छाप सोडली आहे.**

त्यांची मायबोली असलेल्या पोवारी बोलीतील त्यांचे लेखनकार्य उल्लेखनीय आहे. "मयरी" हा पोवारी बोलीतील त्यांचा पहिलाच काव्यसंग्रह आहे. त्यांच्या या कविता संग्रहावर पोवारी संस्कृतीची (संस्कार) छाप पडलेली दिसून येते.

कवी बिसेन यांच्या मयरी या कविता संग्रहाचे विशेष म्हणजे तो विविध काव्यप्रकारांतील कवितांनी सजलेला आहे. यात अष्टाक्षरी, दशाक्षरी, नवाक्षरी, षडाक्षरी, सुधाकरी अभंग, काव्यांजली, षोडशाक्षरी, दोहा, शिरोमणी, नेटलग्या, द्वादशाक्षरी, द्रोण, श्री काव्य, बाराक्षरी, इत्यादी काव्यप्रकारातील कविता आहेत. हा कवितासंग्रह वाचताना वाचकाला एकाच ठिकाणी विविध काव्यप्रकारांचा रसास्वाद घ्यायला मिळतो. कवीने या कवितासंग्रहाची सुरूवात संत ज्ञानेश्वर माऊलींच्या पसायदानच्या पोवारी अनुवाद "प्रसायदान" या कवितेने केलेली आहे. 'घरं आया गणपती', 'गणेश जन्म', 'कान्हा', 'भोला भंडारी', 'ईठ्ठल' या कविता भक्तिरसाचे सिंचन करतात. "ईठ्ठल" या कवितेत पंढरीच्या पांडुरंगाच्या भक्तिचे वर्णन करतांना लिहितात,

**करू तोरो ध्यान । ईठ्ठल माऊली ।**
**कृपाकी साऊली । मोरो साती ॥**
**जग मा पावन । चंद्रभागा तीर ।**
**उभो से मंदिर । ईठ्ठल को ॥**
**मोरी होसे इच्छा । जाऊ एकघन ।**
**करून दर्शन । माऊली को ॥**

'गुरु की महिमा', 'मोरो गुरुदेव' या कवितांतून गुरुभक्तिचा महिमा कवीने लिहिला आहे. महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकाचे वर्णन कवीने अत्यंत समर्पक शब्दांत केलेले आहे. पोवारी बोलीतून हे वर्णन वाचताना डोळ्यापुढे राज्याभिषेकाचे संपूर्ण चित्र वाचकाच्या डोळ्यापुढे उभे राहिल्याशिवाय राहत नाही. शिवराज्याभिषेकाची घटना संपूर्ण भारत वर्षासाठी अभिमानाची घटना आहे. त्याचे वर्णन कवी पुढीलप्रमाणे करतो,

**राजा माननला मराठा**
**नोहता तयार ।**
**शिवाजीनं आव्हान करीस स्विकार ॥**
**राज्याभिषेक कर सिरपर धरनला ताज ।**
**भयी से छत्रपती शिवाजी महाराज ॥**




भारतीय संस्कृती सोबतच पोवारी संस्कृतीमध्ये सण उत्सवांना अनन्य साधारण महत्व आहे. विविध सण समारंभातून व्यक्ती व्यक्तितील प्रेम, एकोपा वाढिस लागतो. समाजामध्ये एकोपा वाढतो. प्रत्येक सण आपल्याला काहीना काही शिकवत असतो. 'आता आय गयी होरी', 'दर्श अमावस', 'चैत मास', 'होरी', 'नवरात्री', 'शिमगा', 'तीज', 'बैशाख', 'दसरा', 'कोजागिरी', 'दिवारी', 'करवा चौथ' इत्यादी सणांविषयीच्या कविता अत्यंत वाचणीय अशा आहेत. या कविता वाचताना पोवारी बोलीच्या गोडव्यासोबतच सणांचे महत्व वाचकाला चाखायला मिळते. दिवाळीनंतर गावा गावात मंडई (यात्रा) सुरु होतात. या मंडईचे वर्णन कविने "आया मंडईका दिन" या कवितेत केले आहे. कवी लिहितात,

**मंडईमा भरसेती**
**रंगरंगका दुकान**
**लेनसाती फिरसेती**
**मोठा संगमा नहान**


कवी गोवर्धन बिसेन हे निसर्गात रमणारे कवी आहेत. त्यामुळे त्याचे प्रतिबिंब त्यांच्या कवितांमध्येही उमटलेले दिसून येते. सभोवतालचा निसर्ग त्यांना सतत खुणवत असतो. त्यांना झाडांच्या सहवासात राहायला आवडते. असा निसर्गप्रेमी कवी पर्यावरणातील विविध झाडांचे वर्णन आपल्या खास शैलीत कवितांच्या माध्यमातून करतो. "करो रक्षण निसर्गको", "जोड़ो झाड़ शिव नाता", "हिरवीगार अमराई" या कविता वाचकांच्या पर्यावरणीय जाणिवा वृद्धिंगत करण्यास पुरक ठरतात. तर 'परसा', 'मोवु को झाड़', 'सावर को झाड़', 'जांभुरको झाड़', 'मन मोहसे बहावा' या कविता झाडांचे महत्व पटवून देतात. कवी हा शेतकरी पुत्र आहे. त्यामुळे त्याची नाळ शेतीशी जुळलेली असल्याने आपसुकच शेतशिवाराच्या कविता या संग्रहात वाचकाला वाचायला मिळतात. 'होये फसल चांगली', 'कठाण', 'खातकी बंडी' इ. कविता वाचकाला शेतशिवारात सहज फेरफटका मारून आणतात. "आयेव मिरुग" या कवितेत कवी शेती मातीशी नाते सांगताना म्हणतात,

**आयेव मिरूग**
**भयी खेतकी तयारी**
**फेकन खारी**
**किसानकी**

"मयरी" कविता संग्रहातील कविता ह्या विविध काव्यप्रकारांमध्ये लिहिलेल्या आहेत. सोबत त्यांचे विषयही भिन्न आहेत. त्यामुळे वाचताना वाचकाला त्या खिळवून ठेवण्यात यशस्वी झाल्या आहेत. पोवारी बोलीत मुळातच माधूर्य आणि विशिष्ट लय असल्यामुळे वाचक कवितांमध्ये गुंतत जातो. 'मोरो भारत महान', 'भारत की एकता', 'भारतीय संविधान', 'महाराष्ट्र दिन' इत्यादी कविता राष्ट्रीय एकात्मतेच्या भावनेला अधिक बळ देण्याचे काम करतातच. शिवाय देशाभिमान जागवण्याचा प्रयत्नही करतात. या कविता संग्रहात कवीने त्यांच्या वैयक्तिक आयुष्याला स्पर्श करणाऱ्या कवितांचाही समावेश केला आहे. 'मोरी भार्या तेजेश्वरी', 'मोरी लाडकी पुतणी', 'सासू मोरी साजरी', 'मोरी नातिन यामिनी' या कविता कवीच्या वैयक्तिक आयुष्यातील महत्त्वपूर्ण व्यक्तिंवर लिहिलेल्या आहेत. कवी गोवर्धन यांचा "मयरी" हा पोवारी बोलीतील त्यांचा पहिलाच कविता संग्रह असून त्याने पोवारी बोली साहित्यात आपली वैशिष्ट्यपूर्ण कवितासंग्रह म्हणून मोहर उमटवली आहे. कवी गोवर्धन बिसेन यांचा "मयरी" हा कवितासंग्रह पोवारी बोली साहित्याला नखशिखांत सजवणारा साज ठरलेला आहे.

**पुस्तकाचे नाव - मयरी (पोवारी काव्यसंग्रह)**
**कवी - इंजी. गोवर्धन बिसेन 'गोकुल'**
**मुखपृष्ठ - इंजी. महेन पटले**
**प्रकाशक- इंजी. गोवर्धन बिसेन**
**किंमत - २१० रू.**

# जलप्रदूषण; एक गंभीर समस्या



श्याम बसप्पा ठाणेदार
संपर्क क्र.: ९९२२५४६२९५

आधुनिक केसरी

**देशातील अनेक शहरांना प्रदूषणाने विळखा घातला आहे. दिल्लीसारख्या देशाची राजधानी असलेल्या शहराची प्रदूषणाने काय अवस्था झाली ते आपण पाहिलेच आहे आता देशाची आर्थिक राजधानी आणि आपल्या राज्याची राजधानी असलेल्या मुंबईची अवस्थाही दिल्लीसरखीच होताना दिसत आहे. देशातील सर्वाधिक प्रदूषित शहरात मुंबई दुसऱ्या स्थानावर आहे. मुंबईची हवा प्रदूषणाच्या सर्वोच्च पातळीवर पोहचली आहे. औद्योगिकीकरण व वाढत्या प्रदूषणामुळे हवेत विषारी वायू मिसळला जात आहे. त्यामुळे अनेक आजारांना निमंत्रण मिळत आहे.**

निसर्गाने मानवाला भरभरून दिले. हवा, पाणी ही निसर्गाने मानवाला दिलेली देणगी आहे. पण मानवाने मात्र या देणगीचा आदर करण्याऐवजी त्यात ढवळाढवळ करण्यास सुरुवात केली त्यामुळेच प्रदूषणासारखी भीषण समस्या आज निर्माण झाली आहे. केवळ वायू प्रदूषण हीच आजची एकमेव समस्या नाही तर जलप्रदूषण ही देखील वायू प्रदूषणाइतकीच गंभीर समस्या बनली आहे. जगात सर्वात जास्त मृत्यू हे दूषित पाण्यामुळे होत आहे. संपूर्ण जगात १८० कोटी लोक दूषित पाणी पितात. जागतिक आरोग्य संघटनेच्या आकडेवारीनुसार भारतात ९ कोटीहून अधिक लोक दूषित पाणी पिल्यामुळे आजारी पडतात. ग्रामीण भागातील सत्तर टक्के लोक दूषित पाणी पितात त्यामुळे ग्रामीण भागात दूषित पाण्यामुळे आजारी पडणाऱ्यांची संख्या अधिक आहे. दूषित पाण्यामध्ये फ्लोराईडचे प्रमाण अधिक असते. त्यामुळे मणक्याचे आजार होतात. हाडे ठिसूळ होतात. दात पिवळे पडतात. गॅस्ट्रो, हगवण, टायफॉईड, कावीळ यासारखे आजार उदभवतात. जलप्रदूषणाचा धोका फक्त मानवालाच आहे असे नाही. जलप्रदूषणाचा धोका जलचरांना देखील आहे. प्रदूषित पाण्यात ऑक्सिजनचे प्रमाण कमी असते. ऑक्सिजनच्या कमतरतेमुळे जलचरांना देखील मोठा धोका निर्माण झाला आहे. एकूणच जलप्रदूषणामुळे जीवसृष्टीलाच धोका निर्माण झाला आहे. असे असूनही जलप्रदूषण कमी करण्यासाठी आपण गंभीर नाही असेच म्हणावे लागेल. कारण राज्यातील सर्वच नद्या प्रदूषणाच्या उच्चांकी पातळीवर पोहचल्या आहेत. देशातील प्रदूषित नद्यांचा अहवाल ६ नोव्हेंबरला प्रकाशित करण्यात आला त्यात देशातील २८ राज्ये आणि ७ केंद्रशासित प्रदेशातील ६०३ पैकी ३११ नद्यांची काही क्षेत्रे प्रदूषित आढळली. यात महाराष्ट्रातील ५५ नद्यांचा समावेश आहे. नद्यांच्या प्रदूषण नियंत्रणासाठी केंद्रीय



प्रदूषण नियंत्रण मंडळातर्फे राष्ट्रीय पाणी गुणवत्ता देखरेख कार्यक्रम राबवण्यात येतो यात पाण्यातील रसायने, सूक्ष्मजीव यांचा विचार केला जातो विशेषतः पाण्यातील ऑक्सीजनचा म्हणजे प्राणवायूच्या प्रमाणावरून त्याचे प्रदूषण ठरवले जाते. यासाठी केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळ देशभरातील नद्यांतील पाण्याचे नमुने घेऊन ते प्रयोगशाळेत तपासते. प्रदूषण नियंत्रण मंडळाने सादर केलेला हा अहवाल चिंताजनक आहे कारण या अहवालानुसार देशातील सर्वच प्रमुख नद्या व त्यांच्या उपनद्या प्रदूषित झाल्या असून त्यांचे पाणी पिण्यालायक राहिले नसल्याचे या अहवालात नमूद केले आहे. या अहवालानुसार महाराष्ट्रातील अनेक महत्वाच्या नद्या प्रदूषणाच्या उच्चांकी पातळीवर पोहचल्या आहेत. या अहवालानुसार महाराष्ट्रातील मिठी, भीमा, सावित्री, मुळा या सर्वाधिक प्रदुषित नद्या असून त्या खालोखाल गोदावरी, पवना, कन्हान आणि मुळा - मुठा या नद्या प्रदुषित आहेत. प्रदूषण महामंडळाने मागील वर्षी असाच एक अहवाल सादर केला होता त्यात कोकणातील उल्हास नदी देखील प्रदूषित असल्याचे नमूद करण्यात आले होते. विदर्भातील वैनगंगा, पैनगंगा, वर्धा या मोठ्या नद्यांसह वेण्णा, कन्हान नद्यांचाही प्रदूषित नद्यांमध्ये समावेश आहे. मध्यप्रदेशात उगम पावलेल्या वैनगंगा नदिचा तुमसर ते आष्टी पर्यंतचा ७०७ किमी चा परिसर अतिप्रदूषित म्हणून गणला गेला आहे. यामध्ये नागपूर जिल्ह्यातून वाहणाऱ्या नद्यांचाही सामावेश आहे. या जिल्ह्यातील दुधुस ते राजुरा पर्यंतचा ५१ किलोमीटर पर्यंतचा विस्तार प्रदूषणाच्या उच्च श्रेणीत आहे. कन्हान नदीचा नागपूर ते भंडारा पर्यंतचा १०१ किलोमीटरचा विस्तार अतिप्रदूषित श्रेणीत आहे. वेण्णा नदीही त्याच श्रेणीत असल्याचे दिसते. याशिवाय कोयना, कृष्णा, पंचगंगा या सारख्या मोठ्या आणि महत्वाच्या नद्या देखील प्रदूषित आहेत. वारी निमित्त राज्यातील लाखो वारकरी पंढरपुरात न चुकता येतात आणि चंद्रभागेत न चुकता स्नान करतात ; पण आता चंद्रभागा नदीचे पाणी तीर्थ म्हणूनच काय तर स्नान करण्यासही धोकेदायक असल्याची माहिती समोर आली आहे. चंद्रभागा नदीच्या पाण्यात घाण, कचरा, शेवाळ, अळ्या, किडे आहेत तसेच ते पाणी मैला मिश्रित असल्याचे सामाजिक कार्यकर्त्यांचे म्हणणे आहे. प्रदूषणामुळे देशातील नद्यांचे पाणी पिण्यालायक राहिले नाही. प्रदूषणामुळे केवळ मानावाच्याच नव्हे तर जलचरांच्या अस्तित्वाला धोका निर्माण झाला आहे. अर्थात याला आपणच जबाबदार आहोत. नद्यांच्या काठावर वसलेल्या शहरातील केरकचरा, सांडपाणी, कारखान्यातील रसायन मिश्रित दूषित पाणी, सतत होणारा वाळू उपसा यामुळे नद्या प्रदूषित होत आहेत. केंद्रीय पर्यावरण मंत्रालयाने नद्यांचे हे प्रदूषण रोखण्यासाठी ठोस पावले उचलायला हवीत. जे कारखाने आपल्या कारखान्यांमधून नद्यांमध्ये दूषित पाणी सोडत असतील त्यांचे परवाने रद्द करायला हवेत. वाळू उपसा थांबवायला हवा. जनतेनेही नद्यांमध्ये सांडपाणी सोडू नये. जलप्रदूषण रोखायची जबाबदारी जितकी सरकारची आहे तितकीच ती जनतेचीही आहे. जल है तो कल है... या उक्तीप्रमाणे येणाऱ्या पिढीचे आणि जीवसृष्टीचे रक्षण करायचे असेल तर जलप्रदूषण रोखायलाच हवे.

# ‘काशी-मथुरा मुक्त व्हावी’ ही शिवाजी महाराजांची इच्छा पूर्ण करण्याच्या दृष्टीने वाटचाल !

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** मूर्ती तोडल्यामुळे देवतेचे अस्तित्व नष्ट होत नाही. देवता सूक्ष्मरूपाने त्याच ठिकाणी वास करतात. त्यामुळे ‘एकदा जे मंदिर बनते, ते सदैव मंदिरच रहाते’. काशी विश्वेश्वराचे मंदिर तोडून मंदिराच्या भग्नावशेषावर घुमट बांधून नमाजपठण केले जात आहे. या ठिकाणी असलेल्या श्री श्रृगांरदेवीच्या मंदिराचा दरवाजा बंद करण्यात आली आहे. सद्यस्थितीत केवळ वर्षातून एकदा या ठिकाणी हिंदूंना पूजेसाठी प्रवेश दिला जातो. हिंदूंची मंदिरे नियंत्रणात घेण्याचे हे षड्यंत्र आहे. या विरोधात आपला न्यायालयीन लढा चालू आहे. 16 मे 2022 या दिवशी या ठिकाणी ‘वजू अदा’ करण्यावर न्यायालयाने बंदी घातली आहे. या ठिकाणी केंद्रीय पुरातत्व विभागाने केलेल्या सर्वेक्षणाचा अहवाल 11 डिसेंबर 2023 या दिवशी न्यायालयात सादर करण्यात येणार आहे. काशी विश्वेश्वर मंदिराच्या अष्टमंडपात सर्व हिंदूंना पुन्हा पूजापाठ करण्याची वेळ लवकरच येईल. ‘काशी-मथुरा मुक्त व्हावी’, अशी छत्रपती शिवाजी महाराज यांची इच्छा होती. त्यामुळे काशी-मथुरा मुक्त करून पुन्हा सनातन धर्माला सोपवण्याची वेळ आली आहे, असे प्रतिपादन काशी येथील ज्ञानवापीचा खटला लढवणारे सर्वोच्च न्यायालयाचे अधिवक्ता विष्णु शंकर जैन यांनी केले. ते ‘ज्ञानवापी, काशी, मथुरा येथील न्यायलयीन लढा आणि यश’, यावर श्री विघ्नहर सभागृहात आयोजित द्वितीय ‘महाराष्ट्र मंदिर न्यास परिषदे’त बोलत होते.

या प्रसंगी अधिवक्ता संदीप जायगुडे म्हणाले, ‘‘अत्यंत प्राचीन असलेल्या नेवासा, नगर येथील श्री नारदमुनींच्या मंदिराच्या परिसरात ‘कबरी’ उभारून अतिक्रमण करून ते मंदिर ताब्यात घेण्याचा मुसलमानांचा प्रयत्न आहे. आता तेथील मंदिराच्या संपूर्ण भूमीवर ‘वक्फ’ने दावा केला आहे. आमच्याकडे असलेल्या पुराव्यांच्या आधारे या निर्णयाच्या विरोधात आम्ही उच्च न्यायालयात स्थगिती मिळवली आहे.’’ सनातन संस्थेचे प्रवक्ते श्री. चेतन राजहंस म्हणाले, ‘‘सनातन धर्म नष्ट व्हायला पाहिजे, सनातन धर्म एक रोगासारखा आहे’ अशी वक्तव्ये जाणीवपूर्वक केली जात आहेत. आज सनातन धर्माला संपवण्याची भाषा होत असेल, तर उद्या मंदिरांनाही संपवण्याची भाषा केली जाईल. त्यामुळे अशांचा संवैधानिक विरोध करण्यासाठी त्यांच्या विरोधात धार्मिक भावना दुखावल्याप्रकरणी पोलीस ठाण्यात तक्रार करून सनातन धर्मरक्षणाचे पाऊल टाकूया !’’

या वेळी हिंदु जनजागृती समितीचे राष्ट्रीय प्रवक्ते श्री. रमेश शिंदे म्हणाले, ‘‘उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथजी यांनी ‘हलाल जिहाद’च्या माध्यमातून चालू असणारे देशविरोधी षड्यंत्र रोखण्यासाठी पुढाकार घेतला आहे. योगीजींनी घेतलेला हा निर्णय स्तुत्य आहे. कोट्यवधी रुपये देऊन ‘हलाल’ सर्टिफिकेट विकत घेणाऱ्या इस्रायलने हमास आक्रमणाला प्रत्युत्तर दिले म्हणून इस्लामी संघटनांनी इस्रायलच्या उत्पादनांवर बहिष्कार करण्यास चालू केले. अमेरिकेतील मंदिरांनी हलाल जिहाद विरोधात जागृती करण्याचे कार्य चालू केले आहे, आपणही आपल्या मंदिरांतून जागृती करण्यासाठी पुढाकार घ्यावा.’’

यावेळी ओझर येथील श्री विघ्नहर गणपति मंदिर देवस्थानच्या वतीने अधिवक्ता विष्णु शंकर जैन यांचा शाल आणि विघ्नहर श्री गणेशाची प्रतिमा देऊन सत्कार करण्यात आला. या वेळी श्री विघ्नहर गणपति मंदिर देवस्थानचे अध्यक्ष श्री. गणेश कवडे, विश्वस्त श्री. आनंदराव मांडे, भीमाशंकर देवस्थाचे अध्यक्ष श्री. सुरेश कौदरे उपस्थित होते. या प्रसंगी लेण्याद्री देवस्थाचे अध्यक्ष श्री. जितेंद्र बिडबई यांनीही अधिवक्ता विष्णु शंकर जैन यांचा सत्कार केला.

# आ. बबनराव लोणीकरांच्या हस्ते कापूस खरेदी केंद्राचे उद्‌घाटन

## कृषी उत्पन्न बाजार समितीमार्फत उच्च दर्जाच्या सुविधा उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न

आधुनिक केसरी न्यूज

**परतूर :** शेतकऱ्यांनी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून शेती पिकवावी असे आवाहन माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी केले. ते परतुर येथे अक्षय जिनिंग मध्ये आयोजित सीसीआय कापूस खरेदी केंद्राच्या उद्‌घाटन प्रसंगी बोलत होते.

पुढे बोलताना माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर म्हणाले की पारंपारिक पद्धतीने शेती करणे आता दुरापास्त झाले असून पारंपारिक शेतीच्या, जीवावर शेतकऱ्यांचे फारसे भागत नाही या पद्धतीने शेती केल्यास शेतकऱ्यांच्या हाती काहीच लागत नाही त्यामुळे शेतकऱ्यांनी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून शेती करावी असेही यावेळी त्यांनी नमूद केले,

पुढे बोलताना माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर म्हणाले की परतुर आणि आष्टी कृषी उत्पन्न बाजार समिती यांचा विकास करणे आपले ध्येय असून केंद्र व राज्य सरकार मार्फत या कृषी उत्पन्न बाजार समितीच्या विकसित करण्यासाठी आपला प्रयत्न राहणार असून शेतकऱ्यांसाठी गोडाऊनची व्यवस्था ,शेतकरी निवास, पिण्याचे शुद्ध पाणी यासोबतच पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी आपण प्रयत्न करत असून यासंदर्भातले प्रस्ताव पणन मंडळाकडे पाठवले असल्याचे यावेळी बोलताना त्यांनी नमूद केले.

शेतकऱ्यांच्या विकासामध्ये कृषी उत्पन्न बाजार समितीची भूमिका महत्त्वाची असून ही भूमिका कृषी उत्पन्न बाजार समितीच्या माध्यमातून पार पाडावी प्रशासन उत्तम चालावे यासाठी सर्व सुविधा उपलब्ध करून देणार असल्याचे यावेळी आमदार बबनराव लोणीकर यांनी उपस्थितासी बोलताना सांगितले.

पुढे ते म्हणाले की , केंद्र सरकार व राज्य सरकार हे शेतकऱ्यांच्या विकासासाठी कटिबद्ध असून शेतकरी हिताच्या अनेक योजना केंद्र व राज्य सरकारच्या माध्यमातून सध्या राज्यभरात राबविण्यात येत असल्याचे यावेळी बोलताना त्यांनी नमूद केले यावेळी माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांच्या शुभहस्ते वजन काट्याचे पूजन करून पहिल्या पाच कापूस विक्रेत्या शेतकऱ्यांना फेटे बांधून सत्कार करण्यात आला.





# अवकाळी पावसामुळे पिके उद्‌ध्वस्त

## प्रती एकर 50 हजार नुकसान भरपाई द्यावी

आधुनिक केसरी न्यूज

**संकेत बागरेचा**

**भंडारा :** जिल्ह्यातील संपूर्ण तालुक्यात अवकाळी झालेल्या पावसामुळे जनजीवन विस्कळीत होऊन कापनी केलेले धान  शेतातच पाण्यावर तरंगत आहे. भात पिकासह तूर, चना, मका, मिरची व भाजीपाला पिकांचे पूर्णतः नुकसान झाले. हातासी आलेले पिक उध्वस्त झाल्याने शेतकरी हवालदील झाला. शेतकऱ्यांवर उपासमारीची पाळी येऊ लागली आहे. शेतकऱ्याचे हित जोपासून महाराष्ट्र शासनाने प्रती एकर 50 हजार रुपयांची आर्थिक मदत तत्काळ देण्यात यावी अशी मागणी शिवसेना (उ .बा.ठा.) भंडारा जिल्हयाच्या वतीने केली आहे. शेतकऱ्यांना शासनाने मदत न केल्यास शेतकरयाच्या हितासाठी शिवसेना रस्त्यावर उतरुन तीव्र आदोंलन करेल भंडारा जिल्हा हा भात पिकाचा जिल्हा असून येतिल शेतकरी भात पिकावर अवलंबून आहेत .मंगळवारी पहाटेपासून संततधार अवकाळी पावसामुळे शेतात असलेले धानाचे कळपे पुर्णतः ओलेचिंब होउन पाण्यावर तरंगत आहेत काही ठिकाणी धानाच्या गंज्या ओल्याचींब झाल्यात ,चना,पोपट,तुर ,मिरची व भाजीपाला या अवकाळी पावसामुळे व ढगाळ वातावरणामुळे पुर्णतः नेस्त नाबूद झाला.उत्पादन खर्च कपात करुन हाताला शेतकरयांना नफा अपेक्षीत होता पंरतू या अवकाळी पावसामुळे हात तोंडासी आलेला घास हिरावून गेल्याने शेतकरी हवालदील झाला आहे. आदी शेतकरयांनी शेतीसाठी बँके कडून घेतलेले कर्ज व इतरांकडून उसनवारी कर्ज घेउन शेती केली.पिक आल्यानंतर घेतलेले कर्ज फेड करुन आपल्या परीवाराचा कसाबसा गाडा चालवून या आ.शेने शेतकरी वाट पहात होता परंतू याअवकळी पावसाने कहर केल्याने पिक उध्वस्त झाले त्यामुळे शेतकरी संकटात सापडला.कर्ज कसे फेडावे परीवाराचा उदरनिर्वाह कसा चालवावा या विचारांनी शेतकरयावर आत्म हत्या करण्याची पाळी येउ शकतो शेतकरयावर आलेला संकटातून दूर करण्यासाठी शासनानी शेतकरयांचे हीत जोपासून प्रति एकर 50 हजार आर्थीक मदत तात्काळ करुन शेतकरयांचे जिव वाचवावे अशी मागणी शिवसेना( उ.बा.ठा. )भंडारा जिल्हयाच्या वतीने शासनास निवेदन देतांनी शिवसेनेचे पदाधिकारी श्री.नरेश डाहारे जिल्हा सहसंपर्क प्रमुख,रवि वाढ्ई जिल्हा प्रमुख,दिपक गजभिये उप जिल्हाप्रमुख, देवेन्द्र कारेमोरे तालुका प्रमुख, अनील वरकडे,विरेन्द्र मोठघरे,दिनेश पडोळे,गजानन कळंबे, दादाराम बोन्द्रे,दिनेश भुरे,जतन टांगले, धनपाल गजभिये,अरवींद पडोळे, सुयोग धाबेकर, राजू शेन्डे, चिराग चेटूले, महेन्द न्यायखोर,बाबुलाल राखडे,सचीन सुरपांग,सुभाष वाघमारे, गुरुदेव लिचडे व अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.

# ज्ञानकुंज महाविद्यालयातील मंदाकिनी गायकवाड या विद्यार्थिनीचा सत्कार

आधुनिक केसरी न्यूज



**बाजार सावंगी :** ज्ञानकुंज कला वाणिज्य व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय बाजार सावंगी या महाविद्यालयाची विद्यार्थिनी कुमारी मंदाकिनी गायकवाड या विद्यार्थ्यांचा सत्कार मागील दोन दिवसापूर्वी लोकमतचे पत्रकार सय्यदलाल यांनी मंदाकिनी गायकवाड या विद्यार्थ्यांना अवकाळी  पाऊस या विषयावर कविता लिहिण्यास सांगितले व या विद्यार्थ्यांनी ती कविता लिहून दिली व त्या कवितेची दखल महाराष्ट्राचे सुप्रसिद्ध हास्य कवी मा. विष्णू सुरासे सर यांनी व मा. सय्यद लाल व गावचे ज्येष्ठ नागरिक पुंजाजी अण्णा नलावडे यांनी घेतली व सत्कार रुपी या  विद्यार्थिनीला शाल व कविता लिहिण्यासाठी एक मोठी डायरी भेट म्हणून दिली व सर्व विद्यार्थ्यांना सखोल मार्गदर्शन केले त्याबद्दल सांगावसे वाटते की एक पत्रकार ही आपल्या विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव देण्यासाठी त्यांनी जो सत्कार केला त्याबद्दल ज्ञानकुंज शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष विजयजी द्वारकुंडे साहेब व व सचिव भाऊसाहेबजी काळे सर यांच्या वतीने मी प्रा. योगेश सुरडकर सर त्यांचे आभार व्यक्त करतो,याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य योगेश झिंजुर्के प्रा. मनोज राणे,श्रीमती योगिता पारनेरे नितीन पवार, राम राठोड श्रीमती वृषाली कुलकर्णी, कृष्णा चव्हाण,अविनाश गाडेकर,योगेश सुरडकर,श्रीमती सुरेखा जाधव, दीपक पाटील,राहुल गायकवाड,श्री भूषण जाधव,अविनाश कोलते,  अक्षय जाधव,श्रीमती नलावडे,पाचवने मॅडम, खान मॅडम ,चोपडे मॅडम, आजिनाथ जाधव , धुमाळ बाबा, यांची उपस्थिती होती.

# पिंपात बुडवून चार वर्षांच्या बालकाला मारले

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** शहरातील फिरदोन नगरात कंस मामाला लाजवेल असा निर्दयपीणा एका मामाने दाखवला आहे. मोठ्याने रडत असलेल्या चार वर्षाच्या बालकाला त्याच्या मामाने पाण्याने भरलेल्या पिंपात बुडवून मारण्याचा प्रकार बुधवारी उघडकीस आला आहे. मंगळवारी दुपारी शहरातील फिरदोस नगरमध्ये ही धक्कादायक घटना घडली. याप्रकरणी चाळीसगाव रोड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणी धुळ्यातील फिरदोस नगरमधील मरियमबी हुसेन (२८) यांनी चाळीसगाव रोड पोलीस ठाण्यात दिलेल्या तक्रारीनुसार मरियम या त्यांच्या आई-वडिलांकडे गेलेल्या असताना त्यांचा चार वर्षांचा मुलगा मोहम्मद हा घरात खेळत होता. खेळतांना तो मोठ्याने रडू लागल्याने त्याचा मामा नुरुल अमीन नईम अहमद (२२) याने मोहम्मद यास पाण्याने भरलेल्या पिंपात टाकले. यामुळे मोहम्मदचा पाण्यात बुडून मृत्यू झाला. मंगळवारी दुपारी साडेतीन वाजता हा प्रकार घडला. मोहम्मद हा रडू लागल्याने नुरुल अहमदचे डोके दुखू लागले होते. यामुळे त्याने संतापात मोहम्मद यास पाण्यात टाकले, असा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे.

# टवाळखोरांविरुद्ध पोलिसांची कारवाई

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** जिल्ह्यातील चारही तालुक्यासह शहरातील विविध शाळा, महाविद्यालय परिसरात विनाकारण फिरणाऱ्या सुमारे ३८१ टवाळखोरांविरुध्द पोलिसांनी विविध कलमान्वये कारवाई केली. पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे यांच्या आदेशाने धुळे शहरासह जिल्ह्यात विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. अधीक्षक धिवरे यांनी जिल्ह्यातील सर्व पोलीस ठाण्यातील प्रभारी अधिकार्यांना शाळा व महाविद्यालय परिसरात टवाळखोरी करणाऱ्यांविरोधात कारवाईचे आदेश दिले आहेत. धुळ्यात पथकाने जयहिंद महाविद्यालय देवपूर, एसएसव्हीपीएस महाविद्यालय, नॅशनल उर्दू शाळा चाळीसगांव रोड, भावरी महाविद्यालय धुळे तालुका, सी.एस.बाफना शाळा व कनिष्ठ महाविद्यालय, आदर्श शाळा निजामपूर, गर्ल्स हायस्कुल, बीओडी महाविद्यालय, नुतन महाविद्यालय दोंडाईचा, सना शाळा चाळीसगांव रोड, महाविद्यालय शिंदखेडा, मुलींचे वसतिगृह, शिरपूर तालुका, साक्रीमधील विद्यावर्धिनी महाविद्यालय या १३ शाळा आणि महाविद्यालयांच्या परिसरात विशेष मोहिमेंतर्गत विनाकारण फिरणाऱ्या आणि टवाळखोरी करणाऱ्या युवकांची झाडाझडती घेण्यात आली.





# ठिकठिकाणी नादुरुस्त रस्ते नागरिकांचे हाल

आधुनिक केसरी न्यूज

**बाजारसावंगी :** खुलताबाद तालुक्यातील बाजार सावंगी महसूल मंडळ मधे नादुरुस्त रस्त्यांमुळे प्रवासी नागरिक वाहनधारक यांचे हाल सुरु आहे. या संदर्भात विभागाला बातम्या द्वारे अवगत करुनही विभाग मात्र महात्मा गांधींच्या माकडांची भूमिका राबावत आहे. तालुक्यातील बाजार सावंगी -रेल धामणगाव, रेल -इंदापूर, बोडखा -इंदापूर, बाजार सावंगी -ताजनापूर चौफुली, बाजार सावंगी -वडोद माटरगाव सुलतानपूर, टाकळी राजेराय मुख्य रस्ता ते दोन रस्ते विरमगाव व गाव बाहेरील नदी लगतचा रस्ता, फुलंब्री -खुलताबाद मुख्य रस्ता ते साखर कारखाना, विरमगाव, येसगाव नं तीन ते किनगाव फाटा, काटशेवरी ते टाकळी राजेराय आदि ठिकाणचे रस्ते नादुरुस्त, खड्डेमय, अरुंद खडी उखडलेले, ठिकठिकाणी मोठमोठी खड्डे असे असताना अनेक वर्षांपासून रस्ता दुरुस्ती नागरिक आहे.मात्र सार्वजनिक बांधकाम विभाग व जिल्हा परिषद बांधकाम विभाग महात्मा गांधी यांच्या माकडांची भुमिका नभावत आहे. सुनना नही, बोलणा नही, देखना नही मात्र त्रास नागरिकांना होत आहे व विभाग या रस्त्याच्या देखरेखीसाठी आहे. परंतु काहीच होत नाही. विभागाने या रस्त्यांची पाहणी करून माहिती घेवून रस्ते दुरुस्ती तथा खडीकरण डांबरीकरण मजबुतीकरण काम करावे, अशी मागणी नागरिकांतून व वाहनधारकांतून होत आहे.

# कष्टाशिवाय माणूस जीवनात प्रगती करु शकत नाही : श्रीमती लोहगावकर

## भागवत बनसोडे सेवा निवृत्तीनिमित्ताने सत्कार

आधुनिक केसरी न्यूज

**नांदेड :** कष्टाशिवाय माणूस जीवनात प्रगती करु शकत नाही. त्यानुसार मजूरी करत शिक्षण घेतले शिक्षक होण्यापर्यंत भागवत बनसोडे यांचा प्रवास हा कौतूकास्पद आहे, असे प्रतिपादन श्रीमती कमल लोहगावकर यांनी केले. नवी वाडी ता.नांदेड येथील प्राथमिक शाळेचे शिक्षक भागवत मुकूंदराव बनसोडे यांच्या सेवानिवृत्ती निमित्ताने आयोजित केलेल्या सत्कार सोहळ्यात बोलतांना केले. अध्यक्षस्थानी ज्येष्ठ पत्रकार कमलाकर जोशी होते.

नवी वाडी येथील शिक्षक बनसोडे हे चौतीस वर्षे सेवेनंतर निवृत्त झाले आहेत. त्यानिमित्ताने मित्र परिवाराच्यावतीने हॉटेल अतिथी सभागृहात सेवापूर्ती निमित्त गौरव समारंभ आयोजित करण्यात आला. प्रारंभी मित्र परिवार व डी.एड. चे सहकारी मित्र शिक्षकांनी भागवत मुकूंदराव बनसोडे व त्यांच्या सुविद्य पत्नी सौ. कांता भागवत बनसोडे यांचा शाल पुष्पकार आणि भेट वस्तु देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी प्रमुख पाहुणे गट शिक्षणाधिकारी, गंगाधराव राठोड, गटशिक्षणाधिकारी लोकेश गोडबोले, गटशिक्षाधिकारी दिलीप सुपे, डॉ.हेमंत कार्ले, सेवा निवृत शिक्षक धोंडीराज मुस्तापुरे हे उपस्थित होते. यावेळी वक्त्यांनी बनसोडे यांनी शिक्षण क्षेत्रात केलेल्या कार्याचा गौरव केला. यावेळी मुख्याध्यापक नागनाथ हुंडे, मुख्याध्यापक पंडीत पवळे, कामठा (बु.) चे सरपंच विश्वनाथ दासे, मराठा सेवा संघाचे उद्व सूर्यवंशी यांची गौरवपूर्ण भाषणे झाली. या कार्यक्रमाचे प्रस्ताविक- राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त शिक्षक प्रविण पाटील यांनी केले. कार्यक्रमाचे आयोजन सौ.अंजली कुलकर्णी, अशोक राऊत, नागनाथ हुंडे, पांडूरंग मुंडे, उमाकांत हते व वामन लोंढे यांनी केले होते. या कार्यक्रमास निवृत गट शिक्षणाधिकारी, शिक्षक, नागरीक मोठ्या संख्येने उपस्थित होते. आभार शिक्षक उदय कुलकर्णी यांनी मानले.




# संविधान हाच युवा पिढीच्या समृद्धीचा महामार्ग : डॉ. सोनकांबळे

आधुनिक केसरी न्यूज

**घनसावंगी :** डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजी नगर राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने संविधान कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते यावेळी उद्घाटक म्हणून संत रामदास महाविद्यालयाचे प्राचार्य आर.के. परदेशी तर अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. राम चव्हाण हे होते.यावेळी विषय तज्ञ म्हणून एमजीएम विद्यापीठाचे राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ. ह. नी. सोनकांबळे हे उपस्थित होते.यावेळी उप प्राचार्य डॉ. सुभाष जाधव यांची उपस्थिती होती. प्रास्ताविक डॉ. भीमराव पूंडगे यांनी केले. यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना डॉ ह. नी. सोनकांबळे म्हणाले की, युरोप मध्ये संविधान अस्तित्वात आल्यानंतरच युरोपच्या प्रगतीला सुरुवात झाली, भारतात ही तेच घडले. म्हणून भावी पिढीच्या हातात संविधान असणे गरजेचे आहे. संविधान हाच युवा पिढीच्या



समृद्धीचा महामार्ग आहे. असे प्रतिपादन डॉ. ह. नि. सोनकांबळे यांनी केले. पुढे बोलताना सोनकांबळे म्हणाले की, विद्यार्थ्यांच्या हातात संविधान असल्याशिवाय त्याला त्याचे अधिकार आणि राष्ट्राप्रति असलेले कर्तव्य समजणार नाहीत. जोपर्यंत अधिकाराबरोबरच तरुण पिढी आपले कर्तव्य जाणून घेणार नाही तो पर्यंत एक चांगले राष्ट्र अस्तित्वात येणार नाही. म्हणून चांगल्या राष्ट्राच्या निर्मितीसाठी संविधान महत्वाचे आहे असेही सोनकांबळे म्हणाले. संविधान कार्यशाळेचे उदघाटक संत रामदास महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर.के. परदेशी म्हणाले की," संविधानाचा अभ्यास केल्याशिवाय कोणत्याही महत्वाच्या पदावर जाता येत नाही म्हणू विद्यार्थ्यांनी संविधान वाचले पाहिजे. इतका मोठा विशाल देश एक सूत्रे मध्ये समता, बंधुता आणि न्याय प्रस्थापित होण्यामध्ये संविधानाची भूमिका मोलाची आहे. संविधान कार्यशाळेचे अध्यक्ष मॉडेल कोलेज घनसावंगी चे प्राचार्य डॉ. रामराव चव्हाण म्हणाले की" एक सजग नागरीक घडवण्यासाठी महाविद्यालय सातत्याने प्रयत्नशील आहे. याचाच एक भाग म्हणून विद्यार्थ्यांना आपलं संविधान माहीत व्हावे या उद्देशाने ही कार्यशाळा आयोजित करण्यात आलेली आहे.

या कार्यशाळेचे सूत्रसंचालन डॉ ऋषिबाबा शिंदे यांनी केले तर आभार डॉ वाल्मीक मेश्राम यांनी मानले या कार्यशाळेच्या यशस्वीतेसाठी प्रा. खंडू नवखंडे, प्रा.उदय पवार यांनी प्रयत्न केले. या कार्यशाळेसाठी मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

# पीक विमा खात्यात जमा होण्यास सुरुवात

आधुनिक केसरी न्यूज

**बुलढाणा :** बुलढाणा जिल्ह्यासह राज्यभरातील शेतकऱ्यांच्या खात्यात अग्रीम पीकविम्याची रक्कम जमा होण्यास सुरुवात झाली आहे. यामुळे आपदग्रस्त पन्नास लाख शेतकऱ्यांना दिलासा मिळणार आहे.राज्यात ४९ लाख ५ हजार ०३२ शेतकऱ्यांना २,०८६ कोटी ५४ लक्ष रुपये अग्रीम पीकविमा म्हणून मंजूर झाले आहे. त्याचे वाटप चालू झाले आहे. बुलढाणा जिल्ह्यातील ३६,३५८ शेतकऱ्यांना अग्रीम पीकविमा म्हणून १८ कोटी ३९ लाख रुपये मंजूर झाले आहे. ही रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यात जमा होण्यास सुरुवात झाली आहे. बुलढाण्यात 'एल्गार महामोर्चा, अन्नत्याग आंदोलन केल्यावर २८ नोव्हेंबर रोजी रविकांत तुपकरांच्या नेतृत्वाखाली मंत्रालय ताब्यात घेण्यासाठी शेतकऱ्यांनी मुंबईत धडक दिली होती. दरम्यान २९ नोव्हेंबर रोजी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली रविकांत तुपकरांच्या मागण्यांबाबत बैठक झाली.



# सैलानीत चार वर्षांनंतर पुन्हा बुलडोझर

आधुनिक केसरी न्यूज

**बुलढाणा :** चार वर्षांनंतर तालुक्यातील सैलानी येथील झिरा परिसरातील अतिक्रमण हटाव मोहीम पुन्हा हाती घेण्यात आली आहे. वन विभागाने पोलिसांच्या कडक बंदोबस्तात मंगळवार ( दि . ५ ) पासून ही कार्यवाही सुरू केली.वन विभागाच्या अखत्यारीतील झीरा परिसरात वन अधिकारी एस. ए. आंबेकर व रायपूरचे ठाणेदार दुर्गेश राजपूत यांच्या उपस्थितीत कारवाई हाती घेण्यात आली. वन कर्मचाऱ्यानी सैलानी परिसरातील अस्थायी झोपड्या व दुकानांचे अतिक्रमण काढली. कारवाई अंतर्गत परिसर अतिक्रमण मुक्त करण्यात येणार आहे. सैलानीत वर्षभर येणाऱ्या हजारो भाविकांची व वाहनधारकांची अतिक्रमण मुळे मोठी अडचण होते.

दरम्यान चार वर्षांपूर्वी अतिक्रमण काढण्यात आल्यावर जाळ्या लावण्यात आल्या होत्या. मात्र परिसरात भाविकांनी झोपड्या बांधुन तर व्यावसायीकानी दुकाने थाटली होती. यामुळे कारवाई हाती घेण्यात आली. अनुचित प्रकार घडू नये, यासाठी रायपूर पोलीसांनी चोख बंदोबस्त ठेवला होता.

हिवराळे क्लिनिक ॲण्ड हर्बल हेल्थ केअर
9130174444
डॉ. के.बी. हिवराळे
आयुर्वेद जनरल फिजिशियन,
ॲक्युपंक्चर तज्ज्ञ
B.A.M.S., N.D.,C.M.S.& Ed(MUMBAI)
R.No.2366/12/2000
एमसीए/2022/10/बी/000839 बॉम्बे नर्सिंग होम परवाना क्र.218, औरंगाबाद
उपलब्ध सुविधा
- जुनाट सांधे दुखी (गुडघे दुखी)
- आम वात उदर रोग
- दमा व ॲलर्जी (जुनाट)
- चिकन गुनिया
- मनोकयीईक आजार
- त्वचा व गुप्त रोग
- स्त्रीयांचे आजार
- स्थूलपणा, मूळव्याध
- वंध्यत्व, संतती प्राप्ती
- कॅन्सर सल्ला, मुतखडा
- वजन वाढविणे
- वजन कमी करणे
- केसांच्या सर्व तक्रारी
- लहान मुलांची
- स्मरणशक्ती वाढविणे
पंचकर्म सुविधा (मुख्यकार्य) 1) वमन, 2) विरेचन, 3) बस्ती, 4) नस्य, 5) रक्तमोक्षन

अजिंठा रोड, सारा कॉलनी, फुलंब्री, ता. फुलंब्री, जि. औरंगाबाद

# महाडीबीटी पोर्टलचा अर्ज दाखल होईना; विद्यार्थी मेटाकुटीला

आधुनिक केसरी न्यूज

**दिपक सोनवणे**

**कळवण :** राज्य शासनाच्या विविध शिष्यवृत्ती योजनांकरिता लाभार्थी विद्यार्थ्यांकडून अर्ज भरण्यास सुरुवात झाली पण महाडीबीटी पोर्टलवर अर्जच दाखल होत नसल्याने विद्यार्थी हवालदिल झाले आहेत.

पोर्टलवर तासान तास अर्ज करण्यासाठी वेळ दिला तरी अर्ज दाखल करता येत नसल्याने गैरसोयीमुळे काही विद्यार्थी शिष्यवृत्ती योजनेपासून वंचित राहाण्याची भीती व्यक्त केली जाते आहे. परंतु अडथळ्यांचा डोंगरपार करत अर्ज दाखल करावे लागत असल्याने विद्यार्थ्यांची दमछाक होते आहे. संकेत स्थळावर कुठेही बंद असले बाबत किंवा दुरुस्ती चालू असले बाबत माहिती दिलेली अथवा सूचना दिसत नसल्याने विद्यार्थी मेटाकुटीला आले आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार मागील वीस ते पंचवीस दिवसांपासून पोर्टलवर विविध प्रकारच्यू तांत्रिक अडचणी उद्भवत आहेत. संकेतस्थळावर विद्यार्थ्यांच्या प्राथमिक माहितीच्या आधारे प्रोफाइल अपडेट होताना तांत्रिक अडचणी येत आहेत. प्रोफाईलला आधार उपडेट करण्यासाठी ओटीपी टाकून विद्यार्थी वैतागले पण प्रोफाईल अपडेट होत नसल्याने नाहक त्रास सहन करावा लागत आहे. त्यात नवीन अर्ज करतांना आधार कार्ड नंबर टाकून त्याचा ओटीपी येत नाही आधार सर्वर नॉट रिचेबल म्हणते ओटीपी टाकून देखील लॉगीन तयार होत नाही तर काहींचे चुकून झाले तर प्रोफाईल भरली जात नाही. अशा एक ना अनेक अडचणीमुळे विद्यार्थी त्रस्त झाले आहेत. पोर्टलचा पूर्णपणे फज्जा उडाल्याचे चित्र आहे.

> अनेक दिवसापासून वेबसाईट चालत नसल्याने विद्यार्थी वैतागले आहेत . अनेक वेळा तक्रार टाकून देखील पोर्टल पूर्णपणे चालत नसल्याने गैरसोय होत आहेत . लवकरात लवकर पोर्टल अडचणी दूर करून अर्ज दाखल होतील यासाठी सबंधित विभागाने प्रयत्न करावे : **चेतन शिंदे, कॉम्पुटर व सायबर कॅफे संचालक**
>
> संकेतस्थळ बंद असलेबाबत किवा दुरुस्ती चालू असलेले बाबत नोटीस देण्यात यावी पोर्टलवर, पोर्टल वर तक्रार करण्यासाठी सबंधित विभागाचा नंबर देण्यात यावा, आम्ही २० दिवस झाले घरी पण प्रयत्न करत आहोत आणि ई–सेवा केंद्र व कॅफेत देखील जात आहोत पण अर्ज दाखल होत नसल्याने त्रास सहन करावा लागत आहे आणि अभ्यासाचे देखील नुकसान होत आहे : **अदित्य सोनवणे, विद्यार्थी**

पोर्टलवर दिलेल्या मुख्यमंत्री सहाय्यता कक्ष मदत क्रमांक पूर्ण माहिती देण्यात असमर्थ होत असल्याने विद्यार्थी व पालक त्रस्त होत आहेत. सहाय्यता कक्ष पोर्टलवर जाऊन तक्रार टाकावी असे सांगते पण पोर्टलवर तक्रार टाकण्यास गेले तर ती देखील लिंक चालत नाही.

स्वतः विद्यार्थी, विद्यालय, कॉलेज, सायबर कॅफे, कॉम्पुटर सेंटर, ई-सेवा केंद्र अशा अनेक ठिकाणी प्रयत्न करून देखील अर्ज भरले जात नाही. चुकन एखादा अर्ज पूर्ण होत आहे. सदर शिष्यवृत्ती अर्ज दाखल करण्याची मुदत ३१/०३/२०२४ पर्यंत आहे.

# सोबलगाव, ताजनापूर, सावंगी अखंड हरिनाम सप्ताहाची उत्साहात सांगता

आधुनिक केसरी न्यूज



**बाजार सावंगी :** खुलताबाद तालुक्यातील मौजे सोबलगाव, ताजनापूर, बाजार सावंगी येथे अखंड हरिनाम सप्ताह तथा श्री ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळा चे आयोजन करण्यात आले होते. तीन्ही ठिकाणी यंदा भाविक भक्तांनी नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग प्रतिसाद नोंदवला.

मौजे सोबलगाव येथे दि.२८नोव्हेंबर ते ५ डिसेंबर सप्ताह सुरू होता येथे गावकऱ्यांनी अतिउत्साहीपणे कार्यक्रम राबवला महिलांचा मोठा सहभाग दिसून आला तर शेवटच्या दिवसी काल्याचे किर्तनासाठी व महा प्रसाद भंडारा साठी पुर्णगाव एकवटले व मोठा उत्साह नागरिकांतून दिसून आला.ताजनापूर येथे अखंड हरिनाम सप्ताह तथा श्री ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळा दि.२०नोव्हेंबर ते २७नोव्हेंबर पर्यंत सुरु होता येथे सप्ताहात गावकऱ्यांनी अतिउत्साहीपणे उपस्थिती दाखवली तर काल्याचे किर्तन तथा महाप्रसादाचे सप्ताह ची सांगता झाली.

बाजारसावंगी येथे दि १४नोव्हेंबर ते २१नोव्हेंबर सप्ताह सुरू होता.यंदा विविध नामांकित हभप महाराजांचे दररोज किर्तन ठेवण्यात आले होते यात कधि नव्हे एवढी जनसंख्याने गाव व पंचक्रोशीतील भाविक भक्ता नागरिक उपस्थिती दाखवली व दररोज गाव बाजार पेठ परिसर भाविक भक्तांनी फुलून चित्र दिसून आली.यात महिलांचा प्रचंड प्रतिसाद मिळाला.तिन्ही ठिकाणी विविध नामांकित महाराजांना आमंत्रीत करण्यात आले होते सर्वत्र प्रचंड गर्दीने खचाखच भरलेल्या अवस्थेत भाविक भक्तांनी सहभाग नोंदवत हजेरी लावून किर्तनाचा लाभ घेतला तिन्ही ठिकाणी गावकऱ्यांनी लोक भाविक भक्त महाराजांच्या सेवे झोकून दिले होते कधि नव्हे एवढा प्रतिसाद अखंड हरिनाम सप्ताह तथा श्री ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळा निमित्त दिसून आला.




# मालमत्ता कराच्या नावाखाली धुळे महानगरपालिकेकडून जनतेची लूट

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** धुळे महानगरपालिका प्रशासनाने राज्य शासनाचे ठरवून दिलेले सर्वच नियम सर्रासपणे धाब्यावर बसवून पहिल्या टप्प्यात वाढीव हद्द वाढ झालेल्या 11 गावातील सर्वच मालमत्तांना दुसऱ्या टप्प्यात दुसऱ्या टप्प्यात देवपुरातील सर्वच मालमत्तांना तिसऱ्या टप्प्यात धुळे शहरातील संपूर्ण मालमत्ता धारकांना बेकायदेशीर व नियमबाह्य रीतीने मालमत्ता कर लावण्यात आला आहे. धुळेकर जनतेला एकही सुविधा नियमितपणे देऊ न शकणाऱ्या धुळे महानगरपालिकेने मालमत्ता कर लावण्या संदर्भात महाराष्ट्रात इतिहासच रचला आहे धुळेकर जनतेला काहीच कळत नाही अशी खोटी समजूत स्वतःच्या मनाशी करून नागरिकांकडून बेकायदेशीरपणे पैसे वसूल करण्याचे धंदे बंद करा जनतेला तुमच्यापेक्षा चांगला हिशोब चुकता करता येतो हे लक्षात ठेवा असे बाळासाहेबांची शिवसेना पक्षाचे संजय गुजराथी यांनी पत्रकार परिषदेत सांगितले. महाराष्ट्रातील अ वर्ग ते ड वर्ग महानगरपालिका मग ती मुंबई पुणे नवी मुंबई ठाणे नाशिक छत्रपती संभाजी नगर मालेगाव जळगाव कल्याण डोंबिवली अहमदनगर इत्यादी महानगरपालिकेच्या मालमत्ता कर दर व धुळे महानगरपालिकेच्या करदरामध्ये मोठ्या प्रमाणात तफावत आहे महाराष्ट्रातील सर्वच महानगरपालिकांचा विक्रम मोडीत काढून धुळे महानगरपालिकेने सर्रासपणे सर्वात जास्त कर लावण्याचा विक्रम केला आहे. महानगरपालिकेने नोटीसांवर सुनावणी करताना मा आयुक्त यांनी स्वतः किंवा अधिकार प्रदान केलेले वरिष्ठ अधिकारी यांनी सुनावणी घेणे आवश्यक असताना देखील लिपिक असलेले व कामकाजाचे सोयीसाठी प्रभारी अधीक्षक म्हणून नेमलेले लिपिकांमार्फत सुनावणी घेण्याचे नाटक करण्यात आले. धुळे महानगरपालिका हद्दीत 11 गावे 5 जानेवारी 2018 चे शासन निर्णयानुसार समाविष्ट करण्यात आलेली आहेत सदर गावे धुळे शहराच्या मुख्य शहरापासून जवळजवळ पाच ते सात किलोमीटर अंतरावर आहेत. धुळे महानगरपालिकेने अद्याप पावतो या गावांना कोणत्याही मूलभूत सोयी सुविधा पुरवत नाही ग्रामपंचायत असलेल्या व महानगरपालिका हद्दीत समाविष्ट झालेल्या गावातील नागरिकांना इतक्या मोठ्या प्रमाणात नियमबाह्य रीतीने मालमत्ता कराच्या नोटिसा दिल्यात त्या नागरिकांनी तुमच्या नियमबाह्य अवाजवी मालमत्ता कर भरण्यासाठी आपल्या मालमत्ता खाजगी सावकाराकडे गहाण ठेवायचा का ? असे प्रश्नचिन्ह संजय गुजराथी यांनी यावेळी उपस्थित केले. जनतेचा कोट्यावधी कराची रक्कम ठेकेदारास देण्यामागचे गुड काय असा प्रश्न देखील या वेळेस गुजराथी यांनी उपस्थित केला या कामकाजा संदर्भात ठेकेदारास कोणतेही तांत्रिक ज्ञात नसलेल्या जनतेच्या डोळ्यात धुळपे करून प्रशासन सोबत संगणमताने जनतेवर कराचा बोजा वाढवण्याचे काम सुरू असल्याचे ते म्हणाले कर आकारणीसाठी दिलेला ठेका रद्द करून धुळेकर जनतेने कर रुपात नागरी सुविधा पुरविण्यासाठी दिलेला पैशांचा वापर निरोपयोगी ठेकेदाराच्या घशात न घालता अनुभवी अधिकारी अथवा कर्मचारी यांचे मार्फत पूर्ण मूल्यांकनाचे काम विहित मुदतीत करून घ्यावे या सर्व बेकायदेशीर नियमबाह्य सुरू असलेल्या कामासंदर्भात महापौर सो यांनी त्वरित विशेष महासभा घेऊन महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे अनुसूचित करा धन प्रकरण 8 नियम 5 ते 21 नुसार तसेच शासनाच्या मार्गदर्शक सूचनेनुसारच झोनचे दर व मालमत्ता कर संदर्भात त्वरित निर्णय घेऊन जनतेवर होत असलेल्या अत्याचारातून सुटका करावी अन्यथा लवकरच मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंची भेट घेऊन धुळेकर जनतेला दिलासा देण्यात येईल असे संजय गुजराथी पत्रकारांशी बोलताना म्हणाले.



# ब्रिलियंट स्कूलने दिली संविधान परीक्षा

आधुनिक केसरी न्यूज

**लोणंद :** भारतीय संविधानाची जागृती सर्वांमध्ये व्हावी. हाच उद्देश ठेवून राज्यभर संविधान गुणगौरव परीक्षेचे आयोजन करण्यात आले होते. ही परीक्षा रक्षित सामाजिक संस्था म्हसळे अंतर्गत स्थापित संविधान गुणगौरव समितीच्या वतीने नूरखाँ पठाण लिखित "आपले संविधान... राज्यपद्धती नव्हे तर जीवनपध्दती" या पुस्तकावर आधारित घेण्यात आली होती. खंडाळा पारगाव येथील ब्रिलीयंट इंग्लिश मिडीयम स्कूल येथे परीक्षा घेण्यात आली.या परीक्षा केंद्राचे केंद्रप्रमुख दादासो धायगुडे यांनी ही परीक्षा यशस्वी करण्यासाठी जबाबदारी पूर्वक कामकाज पाहिले.दादासो धायगुडे म्हणाले की,आपल्या देशाचे संविधान भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहिले. संविधान हा आपला राष्ट्रीय ग्रंथ असून याच संविधानाने देशातील प्रत्येक नागरिकाला हक्क आणि अधिकार मिळवून दिले.हे संविधान सर्वांपर्यंत पोहचले पाहिजे.यासाठी संविधाना संबंधित विविध उपक्रम राबविणे आवश्यक आहे.ही संविधान परीक्षा अत्यंत महत्वाची आहे.नक्कीच या परीक्षेच्या माध्यमातून संविधानाची जागृती लोकांमध्ये दिसून येईल.असा विश्वास सुद्धा दादासो धायगुडे यांनी व्यक्त केला.या परीक्षेबद्दल शाळेच्या सचिव स्नेहल खरात यांनी अभिप्राय दिला.त्या म्हणाल्या की,संविधान परीक्षेचा उपक्रम स्तुत्य आहे.संविधानाचे ज्ञान मिळत आहे.यामुळे चांगला नागरिक घडविण्यास मदत होईल. स्वतःचे कर्तव्य व अधिकार यांचे ज्ञान मिळत आहे.एक सुजाण नागरिक बनण्यास मदत होईल.असा विश्वास स्नेहल खरात यांनी व्यक्त केला.परीक्षा सुरू करण्यापूर्वी भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे वाचन करण्यात आले.

विद्यार्थी, शिक्षकवृंद यांनीच नव्हे तर शाळा प्रमुखांनी सुद्धा या परीक्षेत सहभाग घेत संविधान परीक्षा दिली.मोठ्या गटातून सचिव स्नेहल खरात, उपप्राचार्या स्वाती ढमाळ, उपशिक्षिका संध्या मोरे, रुपाली ढमाळ, रेश्मा भोसले,नाजनिन पटेल, मिनल गाढवे, पूजा पडगिलवार, माधुरी बडदे,उषा पवार, वैष्णवी पवार, सागर घाडगे, अक्षयकुमार पवार, मच्छिंद्र मोरे यांच्या सह लहान गटातून इयत्ता सहावीतील सई कदम, स्वरा जगताप, पूर्वी गुठाळे, गुरुप्रसाद येल्लापुरे, इयत्ता सातवीतील पार्थ ढमाळ, नंदिनी भोसले, प्रणाली माळी, सुहाना शेख, जान्हवी जाधव, स्वरा खंडागळे,गायत्री यादव, वेदांतीका यादव,आफिया शेख,आर्यन यादव,इयत्ता आठवीतील निकीता गोगी, यशश्री गोळे, आयुषी यादव,वरुण भोसले,अभिनव ढमाळ,प्रदयुम्न देशमुख,सोहम गाढवे,शिवम किंद्रे,इयत्ता नववीतील सार्थक शिंदे,विवेक खंडागळे,चैताली कदम,तनुश्री येल्लापुरे,श्रवण गाढवे आदी विद्यार्थ्यांनी ही संविधान परीक्षा दिली.आपल्या देशाचे संविधानिक दृष्ट्या नाव काय आहे?भारतीय संविधान कोणासाठी बनवण्यात आलेले आहे?भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार कोणाला म्हटले जाते? कोणता निकष बघून मतदारांनी मतदान केले पाहिजे?आरक्षणाचा संविधानिक अर्थ काय? यांसारखे अनेक प्रश्न या परीक्षेत होते.या अनोख्या उपक्रमाबद्दल शाळेने आभार मानलेले आहेत.या उपक्रमाच्या माध्यमातून संविधान परीक्षा दिल्याबद्दल तसेच शाळेचे प्रमुख जयकुमार खरात व शालेय प्रशासनाचे विशेष अभिनंदन संविधान गुणगौरव समितीचे विलास पवार,नूरखाँ पठाण, सुशिल गायकवाड यांच्याकडून करण्यात येत आहे.





# 16 जिल्ह्यांत होणार 'जिल्हास्तरीय मंदिर विश्वस्त अधिवेशन' !

आधुनिक केसरी न्यूज

**श्रीक्षेत्र ओझर :** श्री क्षेत्र ओझर येथे 2 आणि 3 डिसेंबरला आयोजित करण्यात आलेल्या द्वितीय 'महाराष्ट्र मंदिर न्यास परिषदे'च्या समारोपप्रसंगी 'राज्यस्तरीय मंदिर महासंघा'ची घोषणा करण्यात आली. यात प्रामुख्याने राज्यातील 264 मंदिरांमध्ये वस्त्रसंहिता लागू करणे आणि 16 जिल्ह्यांमध्ये 'जिल्हास्तरीय मंदिर विश्वस्त अधिवेशन' घेण्याचा निर्णय घेण्यात आला. या प्रसंगी सरकारीकरण झालेली सर्व मंदिरे सरकारमुक्त करून महाराष्ट्र सरकारने भक्तांच्या स्वाधीन करावीत, मंदिरातील संपत्ती विकासकामांसाठी वापरण्यात येऊ नये, महाराष्ट्रातील पौराणिक आणि ऐतिहासिक मंदिरांना अर्थसाहाय्य करून त्यांचा जीर्णोद्धार करावा, लेण्याद्री श्री गणेश मंदिरात येणाऱ्या दर्शनार्थींना केंद्रीय पुरातत्व खात्याकडून आकारला जाणारा निधी आकारण्यात येऊ नये, तीर्थक्षेत्रे, गड-किल्ले यांवरील अतिक्रमणे सरकारने तात्काळ हटवावीत, तीर्थक्षेत्रे आणि अन्य मंदिरे यांच्या परिसरात मद्य आणि मांस विक्रीला सरकारने बंदी घालावी, अयोध्या येथील श्रीराम मंदिरातील दीपोत्सवानिमित्त राज्यातील सर्व मंदिरांमध्ये दीपोत्सव साजरा करून श्रीरामजपाचे आयोजन करण्यात यावे, असे महत्त्वपूर्ण ठराव करण्यात आले. परिषदेसाठी श्री अष्टविनायक मंदिरांचे विश्वस्त, महाराष्ट्रातील जोतिर्लिंग देवस्थानांचे विश्वस्त, संत पिठांचे प्रतिनिधी, यासह देहूचे संत तुकाराम महाराज मंदिर, पैठणचे नाथ मंदिर, गोंदवले येथील श्रीराम मंदिर, रत्नागिरी येथील गणपतीपुळे मंदिर, श्री एकवीरा देवी मंदिर, अंमळनेर येथील मंगळग्रह मंदिर, विश्व हिंदु परिषदेच्या मठ-मंदिराच्या प्रांत आयामाचे सहकार्यवाह श्री. जयप्रकाश खोत आणि श्री. महेश कुलकर्णी यांच्यासह राज्यभरातून 650 हून अधिक मंदिर विश्वस्त प्रतिनिधी, उपस्थित होते. यापुढील काळात देशासाठी आदर्श असे मंदिरांचे संघटन महाराष्ट्रात उभे करण्याचे निश्चय सर्वांनी केला. या प्रसंगी महाराष्ट्र मंदिर महासंघाची राज्य कार्यकारिणीची रचना घोषित करण्यात आली. यात प्रामुख्याने महासंघाचे मार्गदर्शक मंडळ घोषित करण्यात आले असून जिल्हास्तरासह  तालुकास्तरावर 'निमंत्रक' घोषित करण्यात आले आहेत. यापुढील काळात गावस्तरावर मंदिर महासंघाचे कार्य पोचवण्याचा निर्धार सर्वांनी केला. दोन दिवस झालेल्या परिषदेत मंदिर सुव्यवस्थापन, देवस्थान जमिनी, कुळ कायदा आणि अतिक्रमण, मंदिरांचा जिर्णोद्धार करतांना द्यावयाची दक्षता, पुजाऱ्यांच्या समस्या आणि उपाययोजना मंदिर हे सनातन धर्मप्रचाराचे केंद्र कसे बनवावे, मंदिरांमधील वस्त्रसंहिता, मंदिर विश्वस्त आणि पुरोहित विश्वस्त कार्यक्रम, धर्मादाय आयुक्त कार्यालय आणि मंदिरांचा समन्वय यांसह विविध विषयांवर मार्गदर्शन झाले. मंदिरांचे व्यवस्थापन या संदर्भात माजी धर्मादाय आयुक्त दिलीप देशमुख यांनी, मंदिराचे व्यवस्थापन करताना भाविकांना केंद्रबिंदू ठेऊन केल्यास आदर्श व्यवस्थापन करता येऊ शकते, असे सांगितले, तर मुंबई येथील बाणगंगा तीर्थक्षेत्र टेम्पलचे ऋत्विक औरंगाबादकर यांनी महाराष्ट्र मंदिर परिषदेच्या माध्यमातून वाळकेश्वर महादेव मंदिराची पुर्नस्थापना आम्ही करू, असे या प्रसंगी सांगितले. 'प्रत्येक मंदिर हे धर्मप्रसाराचे केंद्र व्हायला हवे', असे आवाहन सनातन संस्थेच्या धर्मप्रचारक सद्गुरु स्वाती खाडे यांनी केले.

> मंदिर म्हणजे संपूर्ण हिंदू समाजाचे उत्थान होण्याचे माध्यम आहे . प्रत्येक मंदिरात सांस्कृतिक शिक्षण दिले गेले पाहिजे . सनातन परंपरा शिकवली गेली पाहिजे . एका मंदिराने दुसऱ्या मंदिरांना भेट देऊन एकमेकांना साहाय्य करावे . मंदिरातील पैसे म्हणजे धर्मद्रव्य आहे . आपण सर्वांनी मिळून आपला धर्म, संस्कृती, परंपरा जपण्याचा प्रयत्न या परिषदेच्या माध्यमातून करायचा आहे .
>
> **परिषदेच्या माध्यमातून धर्म, संस्कृती, परंपरा जपण्याचा प्रयत्न करुया !**
>
> **– श्री . गिरीश शाह, सदस्य, भारतीय जीवजंतु कल्याण मंडळ, भारत सरकार**
>
> कानिफनाथ देवस्थानच्या इनामी मिळकतीवर मुस्लिम समाजाने नियमबाह्य पद्धतीने ताबा मिळवला असून सर्व संपत्ती वक्फमध्ये विलीन केली, तसेच कानिफनाथ देवस्थानाचे नामकरण करून हजरत रमजान शहा दर्गा अस्तित्वात आला . धर्मांधांनी सातबारा उताऱ्यावरही या दर्ग्याचे नाव लावण्यासाठी अर्ज केला आहे . ही गोष्ट तेथील ग्रामस्थांच्या लक्षात येताच सर्वांनी संघटित होऊन मंदिर आणि इनामी मिळकतीवर कोणत्याही नोंदी घेऊ नयेत, असा ठराव ग्रामसभेत संमत आहे . कानिफनाथ देवस्थान वक्फच्या ताब्यात न जाण्यासाठी ग्रामस्थांचा प्राणपणाने लढा देत आहेत .
>
> **कानिफनाथ देवस्थान वक्फच्या ताब्यात न जाण्यासाठी ग्रामस्थांचा प्राणपणाने लढा !**
>
> **– अधिवक्ता श्री . प्रसाद कोळसे पाटील**




महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६७ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त समस्त शिव फुले शाहू आंबेडकरवादी समाजतर्फे ब्लड फॉर बाबासाहेब हे स्लोगन घेऊन डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या धुळे येथील मध्यवर्ती पुतळ्याजवळ महारक्तदान शिबिर चे आयोजन करण्यात आले होते. करुणा सोशल ब्लड डोनर ग्रुप यांच्या वतीने शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व सर्वोपचार रुग्णालय यांच्या साह्याने सर्व बहुजन समाज पोलीस अधिकारी  व कर्मचारी यांनी रक्तदान करून महामानवास एक अनोखी श्रद्धांजली देण्यात आली.

# गोंदिया जिल्ह्यात १८०० अंगणवाड्या बंद

आधुनिक केसरी न्यूज

**गोंदिया:** अंगणवाडी बालवाडी कर्मचारी युनियन आयटक व कृती समितीच्या नेतृत्वात अंगणवाडी सेविका, मदतनीस यांनी मानधनात वाढीसह पेन्शन लागू करण्याच्या मागणीसाठी जिल्हा परिषदेवर मोर्चा काढून आंदोलनाला सुरुवात केली. जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यातील महिला व बाल विकास प्रकल्प कार्यालयासमोर आंदोलन करून शासनाचे लक्ष वेधले जात आहे. दरम्यान, मागण्या पूर्ण होतपर्यंत आंदोलन सुरू ठेवण्याचा इशारा या अंगणवाडी सेविका व मदतनिसांनी दिला असून जिल्ह्यातील सर्व १ हजार ८०० अंगणवाड्या बंद आहेत. महाराष्ट्र राज्य अंगणवाडी बालवाडी कर्मचारी युनियन आयटक व कृती समितीने अंगणवाडी सेविका, मदतनीस यांच्या मागण्या ३ डिसेंबरपर्यंत पूर्ण न झाल्यास ४ डिसेंबरपासून बेमुदत संपावर जाण्याचा इशारा दिला होता.

गुप्तरोगाबाबत काहीही लपवू नका

(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट

महावीर
घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही

सुमित 7620111118 राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118

www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com

S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर